|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : ३६ | सोमवार दि. २९ ऑगस्ट २०२२ ते रविवार दि. ४ सप्टेंबर २०२२ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## करायला गेला चोरी तुटली आयुष्याची दोरी

चंद्रपूर/क्राईम रिपोर्टर

मृत्यू माणसाला कधी कुठे आणि कसा गाठील याचा नेम नाही. चंद्रपुरातील अशाच एका घटनेत कोळशाच्या ट्रक मधला कोळसा चोरायला गेलेल्या एका चोराचा त्याच ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला. ज्या ठिकाणी चोरी करायला गेला तिथेच त्याला त्याच्या कर्माची फळ मिळाली. चोरी करणं एकाच्या जीवावर बेतलं आहे. कोळशाची चोरी करायला आलेल्या व्यक्तीला चांगलंच महागात पडलं. ही धक्कादायक घटना चंद्रपूर जिल्ह्यातील नांदगाव लालपेठ ...पान २ वर

# देशभरातील विरोधीपक्षांसाठी ते खलनायक ठरलेत
# सावधान! सरकारे पाडणारे सिरियल किलर बनलेत

दिल्ली/वरिष्ठ प्रतिनिधी



**लोकशाहीत सरकार इतकेच विरोधी पक्षाचे अस्तित्व महत्वाचे असते. कारण विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधीना सुद्धा लोकांनीच निवडून दिलेले असते. त्यामुळे विरोधकांचा आवाज दाबता येत नाही. पण केंद्रातील मोदी सरकारने आणि त्यांच्या भाजपने पाशवी बहुमताच्या उद्योगपतीच्या आणि इडी सारख्या तपास यंत्रणांच्या जोरावर देशातील विरोधी पक्षांची सरकारे एकापाठोपाठ एक पाडण्याचा सपाटा लावला आहे. त्यासाठी आमदार खरेदी केले जात आहेत. जे भाजपकडे यायला तयार नाहीत त्यांना खोट्या गुन्ह्यात अडकवून त्यांच्या मागे इडीची सीडी लावली जात आहे. आणि हे कशा प्रकारे सुरु आहे याचा पर्दाफाश दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केला आहे. दिल्ली विधानसभेच्या विशेष अधिवेशनात बोलताना केजरीवाल यांनी अनेक धक्कादायक गौप्यस्फोट केले आहेत. त्यात देशातील विरोधी पक्षाची सरकारे पडण्यासाठी आमदारांना कसे खरेदी करण्यात आले. त्यासाठी भाजपने किती पैसे मोजले आणि हा पैसा कुठून आला. या सगळ्याचा केजरीवाल यांनी गौप्यस्फोट करताच संपूर्ण देश हादरला आहे.**

त्यामुळे देशात आता मोदी आणि भाजपच्या विरोधात जनप्रक्षोभाची मोठी लाट उसळत आहे. त्याच बरोबर भ्रष्टाचाराच्या विरुद्ध लढण्याची मोदींची घोषणा किती फसवी आहे हे सुद्धा लोकांच्या लक्षात आले आहे. कारण दुसऱ्या पक्षात असताना ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले ते भाजपमध्ये गेल्यावर शुद्ध होतात. त्यांची चौकशी थांबते. इडी कडून चौकशी सुरु असलेल्या महिलांकडून मोदी राखी बांधून घेतात. यालाच भ्रष्टाचार विरुद्धची लढाई म्हणायचे का? असा सवाल जनता विचारीत आहे. त्यामुळे भाजपच्या विरोधात सर्व विरोधी पक्षांनी एकत्र यावे यासाठी जनतेचा दबाव वाढतोय. परिणामी हळू हळू सर्व विरोधक एकत्र यायला लागलेत आणि विरोधकांच्या या मोहिमेचे नेतृत्व मोदींच्या विरुद्ध रणशिंग फुंकून त्यांच्या भाजपा पक्षाला दिल्ली आणि पश्चिम बंगालमध्ये धूळ चारणाऱ्या अरविंद केजरीवाल आणि ममता बॅनर्जी यांच्याकडे जाण्याची शक्यता आहे. केजरीवाल यांनी तर मोदींचे नाव न घेता त्यांना सिरीयल किलरची उपमा दिली आहे.

केंद्र सरकारने दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष शिसोदिया यांच्या विरुद्ध दारू घोटाळ्याचे आरोप करून त्यांच्या मागे इडीची चौकशी लावलेली आहे आणि तेंव्हापासून आम आदमी आणि भाजप यांच्यात रस्त्यावरची लढाई सुरु झाली आहे. त्यामुळेच दिल्ली विधानसभेच्या विशेष अधिवेशनात अरविंद केजरीवाल यांनी भाजपच्या घोडेबाजाराचा पंचनामा केला. केजरीवाल यांनी सांगितले कि भाजपने आतापर्यंत कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र, बिहार, अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय इथली सरकारे पाडली आहेत. त्यासाठी २७७ आमदारांना विकत घेण्यात आले. त्यासाठी साडेपाच हजार कोटी खर्च केले. हा सर्व पैसा जीएसटी आणि महागाईच्या माध्यमातून उभा करण्यात आला आणि तो विरोधी पक्षांचे सरकारे पडण्यासाठी खर्च करण्यात आला. महाराष्ट्रात एका आमदाराची किमत ५० कोटी होती, तर दिल्ली सरकार पाडण्यासाठी आमदारांना २० कोटींची ऑफर देण्यात आली. पंतप्रधानांनी स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना भ्रष्टाचारा विरुद्धच्या लढाईत लोकांनी मला साथ द्यावी असे सांगितले. पण दुसऱ्या पक्षातल्या सर्व भ्रष्टाचाऱ्यांना भाजपात घेऊन त्यांच्या फाईल्स क्लीअर केल्या जात आहेत. शेतकऱ्यांच्या एक दोन लाखांच्या कर्जमाफीसाठी टाळाटाळ करणाऱ्या मोदी सरकारने त्यांच्या उद्योग पती मित्रांची ३ लाख कोटींची कर्ज माफ केली. एका उद्योग पतीचे १० कोटींचे कर्ज मोदी सरकारने माफ केले. त्या उद्योगपतीने भाजपला चेकने मोठी रक्कम दिली. या पेक्षा भ्रष्टाचाराचा मोठा पुरावा काय असू शकतो. असा सवाल केजरीवाल यांनी केला. ज्या मनीष शिसोदियांवर दारू घोटाळ्याचे आरोप केले जात आहेत, त्याच्या शिणधोरणांची न्यूयार्क टाईम्स सारख्या वृत्तपत्रांनी पहिल्या पानावर दखल घेऊन तारीफ केलीय. तर आखाती देशात मोदींचे फोटो... ...पान ६ वर

# सावकारांनी साधला अचूक नेम
# कर्ज घेणाऱ्या चिनूचा केला गेम



मयत चंदन उर्फ चिनू

धुळे/क्राईम रिपोर्टर

**सावकारी व्यवसायाला कायद्याने बंदी असली तरी काही लोक अजूनही हा धंदा करतात आणि व्याजाच्या नावाखाली कर्ज घेणाऱ्यांची आर्थिक पिळवणूक करतात. धुळ्यात भाईगिरी करणाऱ्या चिनू भायने अशाच दोन सावकारांकडून कर्ज घेतले होते. मात्र सावकारांनी त्याच्याकडून व्याजाच्या रूपाने बरीच रक्कम वसूल केली होती. त्यामुळे चिनू त्यांचे उरलेले पैसे द्यायला तयार नव्हता. अखेर एकेरात्री त्यांनी चिनूला गाठले आणि गोळ्या घालून ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही सावकारांना अटक केली आहे.**

धुळे शहरात व जिल्ह्यात विविध प्रकारची उद्योग साखळी अस्तित्वात आहे. आपल्या अंगमेहनतीने व अथक प्रयत्नाने सिंधी बांधवांनी धुळ्यातील बाजारपेठ काबीज केली आहे. अशा या कष्टकरी सिंधी समाजातील चंदन उर्फ चिनू राजेंद्र पोपली नावाचा ४० वर्षीय तरूण गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या सिंधी समाजाला आणि कुमारनगर परिसरातील नागरिकांना त्रासदायक ठरला होता. विविध प्रकारचे अवैध धंदे करणारा चंदन उर्फ चिनू हा चोऱ्यामाऱ्या करू लागला होता. दमबाजी करून लोकांना लुटू लागला होता. समाजाच्या लोकांबरोबर इतर समाजातील लोकांनासुद्धा त्याची डोकेदुखी व्हायला लागली होती.. गेल्या पाच-सहा वर्षामध्ये त्याच्याविरुद्ध विविध पोलीस स्टेशनमध्ये विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. गुंड प्रवृत्तीचा चिनू आता जुगार



जगताशी संबंध ठेवू लागला होता. याच कारणासाठी काही दिवसांपूर्वी अवैध प्रकारे सावकारी व्यवसाय करणारे भटू चौधरी आणि यासिन पठाण यांच्याकडून चिनूने काही रक्कम व्याजाने घेतली. त्या रक्कमेचे ठरलेले व्याज चिनू हा भटू चौधरी आणि यासिन पठाण यांना दर महिन्याला देत होता. मूळ रक्कमेपेक्षा दिल्या गेलेल्या व्याजाची रक्कम कितीतरी पटीने जास्त होती, त्यामुळे मूळ रक्कम आणि व्याज द्यायला आता चिनू तयार नव्हता. व्याजासह मूळ रक्कम मिळावी म्हणून भटू व यासिन हे सतत चिनूमागे लागले होते. सुरुवातीला गोड बोलणारे चौधरी आणि पठाण आता चिनूला मारठोक करण्याची व ठार मारण्याची धमकी द्यायला लागले होते. भविष्यातील धोका लक्षात घेता गेल्या महिन्यात चिनू उर्फ चंदन राजेंद्र पोपली याने देवपूर पश्चिम पोलीस ...पान २ वर

# लग्नाचा तगादा लावताच कायमचे संपवून टाकले
# प्रियकरानेच प्रेयसीला भाईंदरच्या खाडीत फेकले

मुंबई/एस.कुमार

**आजकालच्या प्रेम प्रकरणांना फारसे भवितव्य नसते. प्रेमाच्या नावाखाली एकत्र यायचे आणि मजा मारून झाली कि बाजूला व्हायचे असे प्रकार सुरु आहेत, पण प्रेम प्रकरणात जर एखादी तरुणी लग्नासाठी प्रियकराच्या मागे तगादा लावू लागली, तर प्रियकर मागचा पुढचा जराही विचार न करता तिला कायमचे आपल्या मार्गातून दूर करतो. बोरिवलीतील अभिषेक सरफरे यानेही तसेच केले त्याचे अंकिता सोबत प्रेम होते, पण काही दिवसांनी तिने त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावताच त्याने तिला गोड बोलून भाईंदरच्या खाडीवर नेले आणि पुलावरून खाली ढकलून दिले. मात्र पोलिसांनी मोठ्या शिथाफिने या प्रेमवीराला अटक केली.**







मुंबईतील मलबार हिल येथील भाउसाहेब हिरे मार्ग, डेसीलिया बिल्डीग मधील फ्लॅट नं. २०२ मध्ये राहणारी अंकिता सुरेश शिवगण ही २० वर्षाची तरूणी ३१ जुलै रोजी बेपत्ता झाली होती. तिच्या चुलत बहिणीने अंकिताचा खूप शोध घेतला, परंतु ती मिळून आली नाही. शेवटी तिच्या चुलतभाऊ चंद्रकांत शिवगण याने १ जुलै रोजी मलबार हिल पोलीस स्टेशन गाठून घडलेली सर्व हकीगत पोलिसांना सांगितली. पोलिसांनी हरविलेल्या मुलीचा चुलतभाऊ चंद्रकांत ...पान २ वर

# एकतर्फी प्रेमामुळे प्रेमविराचे दिवस भरले
# बहिणीला त्रास देणाऱ्याला भावाने ठार मारले

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत संदेश

**एकतर्फी प्रेमाची नशा खूप वाईट असते. कारण एकदाका एखादी तरुणी मनात भरली कि मग तिची इच्छा असो अथवा नसो तिला आपली करण्यासाठी तिच्यावर एकतर्फी प्रेम करणारा कुठल्याही ठरला जातो अशा एकतर्फी प्रेमातून काही मुलींच्या हत्या झाल्या आहेत, तर काहींवर ॲसिड हल्ले झाले आहेत. पण जळगावमध्ये मात्र वेगळेच घडले. एकतर्फी प्रेमातून एका मुलीच्य मागे लागलेल्या प्रियकराला त्या मुलीच्या भावाने आपल्या मित्राच्या सहाय्याने ठार मारले. या प्रकरणी दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.**





चारचौघात दिसायला देखणी असलेली मधुबाला (काल्पनिक नाव) अजून अठरा वर्षाची देखील पुर्ण झालेली नव्हती. अल्पवयीन मधुबालाचे चारचौघात खुलून दिसणारे रुप बघून गावातील संदेश तिच्या एकतर्फी प्रेमात पडला होता. तो तिच्या मागावरच रहात होता. शिक्षण घेण्यासाठी ती घरातून केव्हा जाते व घरी केव्हा परत येते याचे टाईमटेबल संदेशने माहित करुन घेतले होते. तिच्या वेळेनुसार तो तिच्या मागावर राहण्यात कोणतीही कसर सोडत नव्हता. गावात राहणारा संदेश आपल्या मागावर रहात असल्याचे मधुबालाच्या लक्षात आले होते. तो एनकेन प्रकारे तिला प्रपोज ...पान २ वर

# घटस्फोटाच्या दाव्याच्या लागल्या जिव्हारी कळा
# कोर्टाच्या आवारातच चिरला त्याने पत्नीचा गळा



बंगळूरू/क्राईम रिपोर्टर

**पती पत्नीचे नाते हे परस्परांच्या एकमेकांवरील विश्वासावर टिकून असते. पण नोकरदार पत्नीवर काही पती संशय घेतात आणि त्यातून संसारात वादळ निर्माण होते हे वादळ जर लवकर शमले नाही, तर त्यात एखाद्याचा जीव जाण्याचाही संभाव असतो. होलेनरसीपूर येथील शिवकुमार आणि त्याची पत्नी चैत्र यांच्या बाबतीतही असेच झाले. शिवकुमार पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारझोड करीत असे त्यामुळे तिने घटस्फोटासाठी न्यायालयात दावा केला. मात्र पत्नी घटस्फोट देऊन पोटगी मागतेय हे पाहून शिवकुमार चिडला आणि त्याने न्यायालयाचा आवारातच पत्नीची गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.**

होलेनरसीपूर येथील शिवकुमार आणि चैत्र यांच्या लग्नाला सात वर्ष झाली. त्या दोघांचा संसार सुखा समाधानाने सुरू होता. त्याच्या संसार वेलीवर या अवधीत दोन फुले ही उमलली. तसे दोघे ही सुशिक्षीत आणि समंज्यंश असल्याने दोघे ही एकमेकाला समजावून घेत होते. तो एका चांगल्या कंपनीत चांगल्या पगारावर जॉब करीत होता. तर ती ही एका कंपनीत नोकरी करीत होती. त्यामुळे त्या दोघांचे तसे बऱ्यापैकी चालले होते. परंतु अलिकडच्या काळात त्या दोघाच्या संसाराला कोणाची दृष्ट लागली ते समजले नाही. तो हल्ली दारू पिऊन येऊन चैत्राशी कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडण करून तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करीत होता. चैत्रा तशी दिसायला सुंदर आणि देखणीच होती. ती ज्या कंपनीत काम करीत होता. तेथील एका तरूणशी अफेयर असल्याची त्याला माहिती समजली होती. त्यामुळे तो तिच्याबरोबर भांडण ...पान २ वर

# पत्नीबद्दल वाईट बोलणे सहन नाही झाले
# मोठ्या भावानेच लहान भावाला ठार केले

चाळीसगाव/क्राईम रिपोर्टर

**कुठल्याही माणसाला त्याच्या पत्नी विषयी वाईट बोलले आवडत नाहीत. मग तो कुणीही असो अगदी रक्ताच्या नात्यातील असला तरी त्याला सोडत नाही. अभोणे गावात एन बैल पोळ्याच्या दिवशी अशाच एका घटनेत लहान भावाने दारूच्या नशेत मोठ्या भावाच्या पत्नीबद्दल आशेपार्ह विधान करताच चिडलेल्या मोठ्या भावाने लहान भावाच्या डोक्यात लोखंडी पार घालून त्याचा खून केला. या प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.**

चाळीसगाव तालुक्यातील अभोणे गावात दारूच्या नशेत असलेल्या मोठ्या भावाने लहान भावाच्या डोक्यात बैल पूजनाची लोखंडी पास डोक्यात घालून खून केल्याची धक्कादायक पोळ्याच्या दिवशी घडली. याप्रकरणी मेहुणबारे पोलीस स्टेशनला रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चाळीसगाव तालुक्यातील अभोणे गावात बैल पोळा सण उत्साह साजरा करत असताना दुसरीकडे अवघ्या तालुक्याला हादरवणारी घटना घडली आहे. मोठा भाऊ पिंटू तुकाराम पाटील (३८) व लहानभाऊ शिवाजी तुकाराम पाटील (३२) हे घरी बैल पूजनासाठी आले होते. लहान भाऊ शिवाजी पाटील याने दारूच्या नशेत शिवीगाळ करायला सुरुवात केली. एवढेच नव्हे तर, लहानभाऊ शिवाजी पाटील याने मोठ्या भावाच्या पत्नीबद्दल आक्षेपार्ह इच्छा व्यक्त केली. त्यामुळे दोघांमध्ये मोठा ...पान ६ वर

# दोघांच्या होणार होत्या वेगवेगळ्या वाटा
# निष्ठूर पतीनेच काढला पत्नीचा काटा



मयत शबाना

सौंदती/क्राईम रिपोर्टर

**पत्नीचे दुसऱ्याबरोबर संबंध असल्यामुळेच ती आपल्याला सोडचिठ्ठी देत आहे असा संशय पतीच्या मनात आल्याने तिला अद्दल घडवण्यासाठी पतीने सरळ तिची हत्या करण्याचा निर्णय घेतला आणि घरी जाऊन तिची चाकूने भोसकून हत्या केली. सौंदती येथील या हत्येच्या घटने नंतर पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.**



आरोपी महबुबसाब

सौंदती येथील साईनगर येथे महबुबसाब गोरवनकोळ्ळ हा पत्नी शबाना आणि दोन मुलासह राहयला आहे. नवरा बायकोच्या भांडणाला अंत हा नसतोच ती भांडणे कुणी किती ही सोडविली तरी मिटत नाहीत. तसेच त्यांचे झाले होते. घरच्या लोकांनी आणि नातेवाईकांनी त्यांच्या भांडणात कितीदा ही मध्यस्थी केली तरी त्यांची भांडणे काही केल्या मिटत नव्हती याला कारण ही तसेच होते. शबाना ही दसायला देखणी सुदंर असल्याने तिचा पती महबुबसाब हा तिच्यावर संशय घेत होता. या कारणातून त्या दोघा नवरा बायकोत दररोज भांडणे होऊ लागली होती. महबुबसाब ही बाहेर कामाला जात होता. त्याच्या घरची परिस्थीती ही बेताचीच होती. संसाराला हातभार लागावा म्हणून शबाना ही सौंदती येथील एका कापसाच्या कारखान्यात कामाला जावू लागली होती.ती कामाला जावू लागल्यावर तर त्याच्या डोक्यात संशयाचा किडा जास्तच वळवळू लागला. तो दारू पिऊन आला की दारूच्या नशेत तो तिला सांग तुझा यजमान कोण आहे. त्याचे तुझे काय संबंध आहेत म्हणून तिला शिव्या देत मारहाण ...पान ६ वर

29 AUGUST TO 04 SEPTEMBER 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 8/27/2022 9:14 PM Page 1



पान १ वरून....

## करायला गेला चोरी...

इथल्या खुल्या कोळशाच्या खाणीत घडली आहे. चंद्रपूर जवळ असलेल्या या खुल्या कोळशाच्या खाणीतून कोळसा ट्रकमध्ये भरला जातो. त्यानंतर हे ट्रक तिथून बाहेर पडतात. खाणीतून ट्रक बाहेर जात असताना तिथे काही चोर या कोळशावर डल्ला मारण्यासाठी टपलेले असतात. असाच एक चोरी करत असताना ही चोरी त्याच्या जीवावर बेतली. कोळसा खाणीतून गुरुवारी संध्याकाळी कोळसा भरून ट्रक बाहेर निघाला. त्यावेळी ठरल्या प्रमाणे चोर तिथे आले. कोळसा चोरण्यासाठी २० ते २५ वर्षाचा तरुणही ट्रकवर कोळसा चोरण्यासाठी चढला. यावेळी त्याचा तोल गेला आणि तो खाली कोसळला. चोर तरुणाच्या अंगावरून ट्रकचं चाक गेल्यानं त्याचा मृत्यू झाला. या घटनेची तक्रार अजून कुठेही नोंदवण्यात आली नाही. तर दुसरीकडे अशा गैरपद्धतीनं कोळशाची चोरी गेल्या काही दिवसांपासून होत आहे. मात्र यावरही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

## सावकारांनी साधला अचूक ...

स्टेशनला आपल्या जीवाला धोका असल्याची फिर्यादही दाखल केली होती. गेल्या काही दिवसांपासून यासिन व भटू यांचा चिनूमागे ससेमिरा चालू होता. जेथे भेटेल तेथे त्यांच्यामध्ये वादविवाद होत असायचा. आता तर चिनूला मारठोकही व्हायला लागली होती. चिनूची प्रकृतीही धडधाकट असल्याने चिनूही या दोघांवर खडसून जात होता. शुक्रवार दि. ५ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या दरम्यान चिनू कारणपरत्वे घराबाहेर गेला असता भटू, यासिन आणि आणखी एक अनोळखी इसम असे तिघे जण चिनू पोपलीच्या घरी गेले होते. पोपली घरी नसल्याने ते तिघे परत गेले. चिनू पोपलीच्या पत्नीने चिनूला फोन करून ही घटना सांगितली. पत्नीचे फोनवर बोलणे झाल्यानंतर चिनू तात्काळ घरी आला. पाच-दहा मिनिटे घरी थांबल्यानंतर फेरफटका मारण्यासाठी ती पुन्हा घराबाहेर पडला. झोपण्याअगोदर चिनू घराबाहेर फेरफटका मारत असतो, हे भटू आणि यासिनला माहित असल्याने ते चिनूच्या घराभोवती दबा धरून बसले होते. फेरफटका मारण्यासाठी चिनू घराबाहेर पडून काही अंतरच झाले असतील तोच दबा धरून बसलेले भटू आणि यासिन हे आपल्या एका साथीदारासह चिनूसमोर उभे ठाकले.. चिनूला शिवीगाळ करत भटू व यासिनने चिनूकडे कर्जाऊ घेतलेली रक्कम परत करण्याची मागणी केली. कर्जाने घेतलेल्या रक्कमेपेक्षा कितीतरी पटीने जास्त रक्कम व्याजाच्या माध्यमातून दिली गेल्याचे चिनूने सांगितले. आत्तापर्यंत तू व्याज देत आला आहे. मूळ रक्कम तुझ्याकडे येणे आहे असे भटू चौधरीने सांगितले, तेंव्हा मी भरपूर पैसे तुम्हाला दिले आहेत. आता एक रुपयासुद्धा मिळणार नाही असे म्हणत चिनू आपल्या घराकडे जावू लागता. हे पाहून भटू, यासिन व एका अज्ञात इसमाने चिनूचा रस्ता अडवला. माझा रस्ता सोडा असे म्हणत चिनूने यासिनला व भटूला जोराचा धक्का दिला. त्यामुळे चिडून भटू व त्याच्यासोबतच्या अनोळखी इसमाने चिनूला घट्ट धरून ठेवले, तर यासिनने त्याच्या जवळच्या गावठी कट्ट्याने चिनूच्या छातीवर डाव्या बाजूला गोळी झाडली. गोळी चिनूच्या छातीत घुसताच तो खाली कोसळला. गोळीबाराचा मोठा आवाज झाला होता. त्यामुळे चिनूला तिथेच टाकून त्या तिघांनी घटनास्थळावरून पोबारा केला. भटू, यासिन व त्यांचा तिसरा सहकारी पळून गेल्यानंतर गोळीबाराच्या आवाजाने चिनूच्या भोवती जमलेल्या समाज बांधवांनी चिनूला त्याच्या घरी नेले. घरी जाताच चिनू पाणी प्यायला व त्याने आपल्या अंगावर यासिन पठाण, भटू चौधरी व त्यांच्या अनोळखी साथीदारांनी गोळी झाडल्याचे सांगितले. चिनूला गंभीर जखम झाल्याचे लक्षात येताच त्याच्या नातेवाईकांनी व परिसरातील लोकांनी चिनूला जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. प्रवासादरम्यान 'चिनू बेशुद्ध झाला होता. रूग्णालयात तपासणी केली असता संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याने चिनू गतप्राण झाल्याचे सांगितले. दरम्यान घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस उपअधीक्षक ईश्वर कातकाडे, धुळे शहर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दादासाहेब पाटील, उपनिरीक्षक कैलास दामोदर हे आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळाचा पंचनामा करून पोलीस अधिका-यांनी चिनूच्या पत्नीकडून व इतर नातेवाईकांकडून घटनेसंबंधी माहिती घेतली. पवन जितेंद्र गुंडीयाल यांनी पोलिसांत फिर्याद दिल्यानंतर त्या आधारे पोलीस स्टेशनला भा.दं.वि. कलम ३०२, ३२३, ५०४, ३४ अन्वये भटू चौधरी, यासिन पठाण व त्यांच्या अज्ञात साथीदारांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. कुमारनगर परिसरात निर्माण झालेली तणावाची परिस्थिती लक्षात घेता उपअधीक्षक ईश्वर कातकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून ईश्वर काका यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे शहर पोलिसांनी उसंत न घेता फरार आरोपींचा माग घेतला. मध्यरात्रीच भटू चौधरी व यासिन पठाण यांना गजाआड केले.

## लग्नाचा तगादा लावताच कायमचे ...

यशवंत शिवगण यांच्या तक्रारीवरून हरविलेली व्यक्ती नोंदवही क्र. ११/२२ अन्वये नोंद करण्यात आली. मलबार हिल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय धुमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चेतन राठोड, घनश्याम बोरसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बनकर, अनिल राजपूत यांच्या पथकासह पोहवा पवार, पो.शि.भगत, तडवी, कोकणी इत्यादी या गुन्ह्याचा तपास करू लागले. बेपत्ता अंकिता शिवगण ही काही लहान मुलगी नव्हती. जी वेळेवर घरी पोहचू शकत नाही. ती तर समजदार व हुशार होती. त्यामुळे हा प्रेमप्रकरणचा मामला असावा असा संशय व्यक्त करण्यात आला. पोलिसांनी तिच्या मोबाईल फोन चे सीडीआर काढले. तिच्या सीडीआरमधील क्रमांकांपैकी दोन नंबर वेगळे होते. १० ऑगस्ट रोजी एका क्रमांकाची पडताळणी करण्यात आली आणि त्यात काहीही संशयास्पद आढळले नाही. पोलिसांनी दुसऱ्या क्रमांक तपासला असता तो अभिषेक सरफरे याचा मोबाईल क्रमांक असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्याच्या सोबत संपर्क साधून अंकिता शिवगणबद्दल विचारले असता त्याने सांगितले की, तो अंकिताला त्यांच्या गावा पासून ओळखतो. पण गेल्या तीन वर्षांपासून मी तिच्या संपर्कात नाही. मात्र सीडीआर अहवालात तो सतत तिच्या संपर्कात असल्याचे दिसून आले. याचा अर्थ तो खोटा बोलत आहे हे स्पष्टपणे दिसून येत होते,. पोलीसांनी तांत्रीक व शास्त्रोक्त पध्दतीने तपास करून संशयित अभिषेक विठोबा सरफरे (वय २२), रा. बी/२०२, बापू अपार्टमेंट, नारंगी रोड, रामू कंम्पाऊंड मागे, विरार पुर्व, वसई, जि. पालघर, या तरुणाला १७ आगस्ट रोजी चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्याची चौकशी केली परंतु तो काही सांगत नव्हता. अंकिताला मी ओळखत नाही असे सांगून तो पोलिसांची दिशाभूल करत होता. दरम्यान ३१ जुलै रोजी अंकिता आणि अभिषेक हे दोघेही एकत्र असल्याचे त्यांच्या मोबाईल लोकेशन वरून स्पष्ट झाले होते.ते शेवटचे लोकेशन भाईंदर मधील होते. पोलिसांनी त्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासून पाहिले असता हे दोघे त्या दिवशी एकत्र फिरत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी मग अभिषेक याला चांगले फैलाव घेतले. तेव्ह कुठे तो बोलता झाला. मग त्याने अंकिता चा खून का केला याचा पाढाच पोलिसांसमोर वाचला. अंकिता शिवगण व अभिषेक सरफरे हे दोघेही रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथील रहिवासी. अंकिता ही अडीच महिन्यांपूर्वी रत्नागिरीतील राजापूरहून मुंबईला आली होती. ती तिचा चुलत भाऊ चंद्रकांत शिवगण यांच्या मलबार हिल येथील भाउसाहेब हिरे मार्ग, डेसीलिया बिल्डीग मधील फ्लॅट नं. २०२ मध्ये राहत होती. तर अभिषेक हा बोरीवली येथील एका बिल्डिंग साईडवर गार्ड म्हणून काम करीत होता. मृत अंकिता सोबत २०१६ पासून ते गावी असतांना एकमेकांसोबत प्रेमसंबंध निर्माण झाले होते आणि सध्या ती लग्न करण्याबाबत त्याचेकडे वारंवार तगादा लावत होती. परंतू अभिषेकची सध्या लग्न करण्याची इच्छा नसल्याने तो सारखा टाळाटाळ करीत होता. खरे तर आर्थिक स्थैर्य नसल्यामुळे तो उत्सुक नव्हता. यामुळे त्या दोघात लग्ना वरून सतत वाद होत होते. लग्नाच्या कारणावरून आपसांत वाद निर्माण होवुन अंकिताने अभिषेक यास शिवीगाळ करून धमकी दिली होती. तू का माझ्याशी लग्न केले नाहीतर मी तुझ्या विरोधात पोलीसात जाऊन तक्रार दाखल करीन. त्यामुळे अभिषेक याला अंकिताचा राग आला होता. तोच राग मनात धरून अभिषेकने अंकिताचा काटा काढण्याचा बेत आखला. दि.३१ जुलै रोजी अभिषेकने अंकिता हिला कॉल करुन व फुस लावून ग्रॅन्ट रोड स्टेशन येथे भेटायला बोलावून घेतले. त्यानुसार ती तेथे आली. तेथे भेटल्यानंतर तो तिला बोरीवली लोकल गाडीने बोरीवली रेल्वे स्टेशन येथे घेऊन गेला. बोरीवलीला उतरल्यावर तो तिला बस स्टँडवर घेऊन गेला. तेथून बस पकडून तो अंकिता हिला भाईंदर रेल्वे स्टेशन याठिकाणी घेवून गेला. त्याठिकाणी त्याने भाईंदर खाडी दाखविण्याच्या बहाण्याने तिला भाईंदर रेल्वे स्थानकापासून रेल्वे रूळांवरून चालत काही अंतरावर असलेल्या भाईंदर खाडी पुलावरील रेल्वे ब्रीजवर घेवुन गेला. तिच्याशी गप्पा मारत तो खाडी पुलावरून जात असताना अंकिता बेसावध असताना त्याने अंकिता हिला पुलावरून खाडीमध्ये ढकलून दिले. ती खाडीत पडताच जीव वाचवण्यासाठी आरडावरडा करू लागली परंतु त्यावेळी आजूबाजूला कोणीच नसल्याने तिला मदत मिळू शकली नाही. शेवटी काही वेळातच पाण्यात बुडून तिचा मृत्यू झाला. अशा प्रकारे अभिषेक याने अंकिता हिला जिवे ठार मारल्याची कबुली दिली. पोलीस तपासत संशयित आरोपी अभिषेक सरफरे याने हरविलेली मुलगी अंकिता शिवगण या तरुणीचा खून केल्याचे निष्पन्न झाल्याने मलबार हिल पोलीस ठाण्यात अभिषेक सरफरे याच्या विरोधात गु.र.क्र. ३४२/२०२२, कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यास या गुन्ह्यात तात्काळ अटक करण्यात आली आहे. हा गुन्हा परीमंडळ २ चे पोलीस उपायुक्त नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली मलबार हिल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय धुमाळे, पोलीस निरीक्षक चेतन राठोड, घनश्याम बोरसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बनकर, अनिल राजपूत, पो. हवा. पवार, पो.शि.भगत, तडवी, कोकणी इत्यादीनी मोठया मेहनतीने उघडकीस आणला आहे.

## एकतर्फी प्रेमामुळे प्रेमविराचे ...

करण्यासाठी प्रयत्न करत होता. मात्र घरुन निघणारी आणी घरी परत जाणारी मधुबाला खाली मान घालून नम्रतेनेच ये जा करत होती. संदेशने आपला सतत पिच्छा पुरवणे तिला खपत नव्हते. मधुबालाच्या मागावर राहून संदेश तिची छेडखानी करत असल्याचा प्रकार गावातील काही लोकांना समजला होता. त्यामुळे असह्य झालेला हा प्रकार तिने आपल्या घरी सांगितला. त्यामुळे तिच्या पालकांनी गावातील संदेश यास चांगल्या शब्दात समजावले. मात्र अंगात तरुण रक्त असलेला संदेश कुणाचे ऐकून घेण्याच्या तयारीत नव्हता. अल्पवयीन मधुबालाच्या अल्पवयीन भावाने देखील संदेशला वेळोवेळी समजावण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. माझ्या बहिणीचा पाठलाग करु नको, तिला त्रास देवू नको अशा स्पष्ट शब्दात मधुबालाच्या भावाने त्याला प्रत्येकवेळी समजावले. मात्र नम्रता हा प्रकार संदेशला माहितीच नव्हता. तो उद्धटपणे मी मधुबालाला पळवून नेणार आहे. तिच्यासोबत लग्न करणार आहे, तुम्ही कुणी माझ्या वाटेत येवू नका अशी अरेरावीची भाषा संदेश वापरत होता. खुद्द मधुबालाने देखील संदेशची कानउघाडणी केली होती. मात्र तिच्या एकतर्फी प्रेमात वेडापिसा झालेला संदेश आपलीच बाजू पुढे दामटत होता. कितीही समजावले तरी संदेश ऐकत नव्हता आणि बहिण मधुबालाचा नाद सोडत नसल्यामुळे तिच्या अल्पवयीन भावाने नाईलाजाने टोकाचा निर्णय घेण्याचे ठरवले. आता संदेशला बघावेच लागेल असा विचार त्याने मनाशी केला. मनातील निर्णय प्रत्यक्षात आणण्यासाठी तो कामाला लागला. मधुबालाच्या भावाचा एक मित्र होता. तो देखील त्याच्याप्रमाणेच अल्पवयीन होता. आपल्या बहिणीला गावातील संदेश त्रास देत असल्याची व्यथा त्याने मित्राला कथन केली. मित्राची व त्याच्या बहिणीची व्यथा त्याने ऐकून घेतली. त्याने मधुबालाच्या भावाला सांगितले की अगोदर पुन्हा एकवेळा संदेशला समजावून बघ. त्याला सुधारण्याची एक संधी दिली पाहिजे. मात्र संदेश कुणाचेच ऐकत नसून तो तिला पळवून नेण्याची भाषा करत असल्याची व्यथा तिच्या भावाने त्याच्या मित्राला सांगीतली. अखेर दोघा मित्रांनी संदेशला धडा शिकवण्याचे ठरवले. अखेर संदेशच्या जीवनातील तो अखेरचा दिवस जवळ आला. गेल्या काही दिवसांपासून मधुबालाचा भाऊ आणि त्याचा मित्र असे दोघे जण संदेशच्या मागावर होते. तो केव्हा आणि कुठे जातो? त्याचे सर्व लोकेशन ते आपल्या नजरेत टिपत होते. ९ ऑगस्ट २०२२ रोजी मधुबालाचा भाऊ आणि त्याचा मित्र असे दोघे जण संदेशच्या मागावरच होते. रात्री साधारण नऊ वाजेच्या सुमारास दोघा मित्रांनी संदेशला एकांतात बोलावून घेतले. काही महत्वाचे बोलायचे आहे असे सांगून त्याला येण्यास प्रवृत्त केले. मधुबाला विषयी काही महत्वाचे बोलणी करायची असेल या विचाराने त्याची कळी खुलली. तो लागलीच दोघांना भेटायला येण्यास तयार झाला. ठरल्यानुसार ९ ऑगस्टच्या रात्री मधुबालाच्या भावासह त्याच्या मित्राला भेटण्यासाठी संदेश आला. दोघा मित्रांनी त्याला मोटार सायकलवर ट्रिपलसिट बसवून घेत कडगाव शिवारात एकांतात नेले. त्याठिकाणी दोघा मित्रांनी मिळून संदेशला पुन्हा समजावले की तु मधुबालाचा नाद सोडून दे. तिचा पिच्छा करु नको. ती तुझ्यासोबत लग्न करण्यास तर दूर ती तुझ्याशी बोलण्यास देखील तयार नाही. तीचे अजून लग्नाचे वय नाही. मात्र एवढे स्पष्ट शब्दात समजावून देखील संदेश आपल्याच तो-यात होता. मी लग्न करेन तर तिच्यासोबतच करेन. मी तीला पळवून नेणार आहे. असे बोलल्याने मधुबालाच्या भावासह त्याच्या मित्राचे रक्त तापले. आपल्याच बहिणीबद्दल आपल्याशी अशा प्रकारे संदेशचे बोलणे तिच्या भावाला आवडले नाही. सुरुवातीला त्याला समजावण्याचा दोघा मित्रांनी भरपूर प्रयत्न केला. मात्र संदेश काही केल्या ऐकून घेण्याच्या तयारीत नव्हता.

अखेर संदेशला पाठमोऱ्या अवस्थेत त्याच्या मानेवर मागच्या बाजूने मधुबालाच्या भावाने चाकूने वार केले. चाकूचे वार मानेवर मागच्या बाजूने होताच संदेश घाबरुन पळत सुटला. तो पळाल्याने दोघे मित्र त्याच्या मागोमाग धावले. पळता पळता संदेश खाली पडला. तो खाली पडताच दोघांनी चाकूने त्याच्या अंगावर सपासप वार करण्याचे काम सुरुच ठेवले. चाकूचे जवळपास ३६ घाव संदेशच्या अंगावर घालण्यात आले. बहुतेक घाव हे त्याच्या तोंडावर आणि छातीवर करण्यात आले होते. चाकूचे ३६ घाव बसल्यानंतर संदेशचे जीवंत राहणे कठीण होते. त्याचा बचाव करण्यासाठी त्या निर्जन स्थळी कुणीही नव्हते. तो दोघा मित्रांच्या रुपात एकप्रकारे मृत्यूला भेटण्यासाठीच आला होता. दोघे मित्र हे संदेशसाठी एकप्रकारे मृत्यूचे माध्यम ठरले होते. संदेश मरण पावल्याची खात्री झाल्यानंतर दोघा मित्रांनी रक्ताने भरलेले अंगातील कपडे फेकून देत घरची वाट धरली. गावात आल्यानंतर दोघांनी त्यांच्या मित्रांना सांगितले की आम्ही संदेशचे काम फिनीश केले आहे. कुणालाच काही सांगू नका. आदल्या रात्री ९ ऑगस्ट रोजी जेवण आटोपल्यानंतर साडेनऊ वाजता संदेश घराबाहेर पडला होता. आलेल्या शेवटच्या मोबाईल कॉलवर बोलणे केल्यानंतर तो रात्रीच घराबाहेर पडला होता. सकाळ झाली तरी संदेश घरी आला नाही. त्यामुळे त्याची आई चिंता करु लागली. वाट बघत बघत त्याची आई रात्री झोपून गेली होती. सकाळी पाच वाजता तिला संदेश जागेवर दिसला नाही. आपला मुलगा संदेश कुठे गेला असेल या विचारात त्याच्या आईने शेजारी पाजारी विचारपूस केली. त्याला फोन लावला असता तो स्विच ऑफ येत होता. संदेशचा तपास सुरु असतांना सकाळी साडे आठ वाजेच्या सुमारास समजले की कुणातरी तरुणाचा मृतदेह कडगाव शिवारातील नाल्यात पडलेला आहे. गावातील काही लोक प्रातर्विधी करण्यासाठी घराबाहेर पडल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. कुणाचा मृतदेह पडला आहे ते उत्सुकतेने बघण्यासाठी संदेशची आई देखील घटनास्थळी दाखल झाली. दरम्यान या घटनेची माहिती नशिराबाद पोलिसांना समजली होती. माहिती मिळताच नशिराबाद पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल मोरे यांच्यासह त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक राजेंद्र साळुंखे, सहायक फौजदार अलियार खान, संजय जाधव, हे.कॉ. शिवदास चौधरी, अतुल महाजन, पोलिस नाईक रविंद्र इंधाटे, किरण बाविस्कर, पोलिस नाईक समाधान पाटील, चालक हशमत अली, पो.कॉ. रुपेश साळवे, विजय अहिरे, बाळू पाटील, गणेश गायकवाड, दिनेश भोई, महिला पो.कॉ. लिना लोखंडे तसेच बाजारपेठ पोलिस स्टेशनचे पोलिस नाईक रमन सुरळकर, पोलिस नाईक यासिन पिंजारी आदी घटनास्थळी हजर झाले. काही वेळाने घटनास्थळी स्वत: पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंडे, अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी, उप विभागीय अधिकारी सोमनाथ वाकचौरे आदी उच्च पदस्थ अधिका-यांनी देखील घटनास्थळी धाव घेत तपासकामी योग्य त्या सुचना दिल्या. घटनास्थळी जमलेल्या गावातील लोकांनी मयत तरुणाला ओळखले होते. घटनास्थळी आलेल्या संदेशच्या आईने देखील हा आपलाच मुलगा असल्याचे ओळखले होते. मृतदेहाची ओळख पटली होती. त्यामुळे पोलिस तपासाचा अर्धा ताण कमी झाला होता. आता मयत संदेशचे मारेकरी कोण होते? एवढ्या निर्घृणपणे चाकूहे ३६ वार करुन त्याची हत्या का केली या प्रश्नांचा उलगडा लावणे पोलिसांसाठी एक आव्हान होते. मयत संदेशच्या आईने दिलेल्या खबरीनुसार नशिराबाद पोलिस स्टेशनला अज्ञात मारेक-याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. १०३/२२ भा.द.वि. ३०२ नुसार दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास स.पो.नि. अनिल मोरे यांनी आपल्या सहका-यांच्या मदतीने सुरु केला. नशिराबाद पोलिस स्टेशनचे पो.नि. अनिल मोरे यांनी गुप्त बातमीदारांच्या मदतीने गावातून कानोसा घेतला. मयत संदेश अढाळे हा गावातील एका अल्पवयीन मुलीच्या कायम मागावर रहात होता अशी माहिती त्यांना मिळाली. त्या अल्पवयीन मुलीची इच्छा नसतांना देखील तो तिच्यासोबत लग्न करण्यासाठी कायम आग्रही भुमिका घेत असे. तिला पळवून नेण्याच्या गोष्टी मयत संदेश हा तिच्या भावासोबत करत होता असे देखील स.पो.नि. अनिल मोरे यांना खब-यांकडून समजले. हा प्रकार गावातील काही लोकांना माहिती होता. घटना उघडकीस येण्यापुर्वी बेपत्ता झालेल्या संदेशने त्या अल्पवयीन मुलीला पळवून नेले असावे असा गावातील काही लोकांचा समज झाला. मात्र सकाळी त्या अल्पवयीन मुलीला प्रातर्विधी करण्यासाठी जातांना काही लोकांनी पाहीले. मात्र संदेश दिसत नव्हता. त्यामुळे नक्कीच काहीतरी गडबड असल्याचे भाकीत काही गावकऱ्यांनी खासगीत वर्तवले. घटनेच्या आदल्या रात्री मयत संदेश अढाळे याला शेवटचा कॉल करणारा कोण होता याचा देखील तपास स.पो.नि. अनिल मोरे यांनी सुरु केला. तपासाअंती त्या अल्पवयीन मुलीच्या अल्पवयीन भावाने मयतास कॉल केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे संशयाची सुई त्या अल्पवयीन मुलाभोवती फिरु लागली. त्याला चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. स.पो.नि. अनिल मोरे यांनी त्याची अगदी शांततेत विचारपुस केली असता त्याने सगळा घटनाक्रम कथन केला. या गुन्ह्यात आपल्या अल्पवयीन मित्राचा देखील सहभाग असल्याचे त्याने कबुल केले. अशा प्रकारे त्याच्या साथीदाराला देखील चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. दोघांनी दिलेल्या माहितीच्या आधारे या गुन्ह्याची उकल झाली. गुन्ह्यात वापरलेले हत्यार व गुन्ह्याचे वेळी अंगावर असणारे कपडे तपासकामी जप्त करण्यात आले. दोघा अल्पवयीन बालकांना बाल न्यायालयात हजर करण्यात आले. या गुन्ह्याचा पुढील तपास स.पो.नि. अनिल मोरे व त्यांचे सहकारी करत आहेत.

## घटस्फोटाच्या दाव्याच्या लागल्या...

उकरून काढून तिला मारहाण करीत होता. तिने त्याला याबाबत बऱ्याच वेळेला समजावून सांगितले होते की, मी तशी बाई नाही तुम्ही उगाच माझ्यावर संशय घेवू नका तरी ही त्याच्या मनात तिच्या चारित्र्याचा संशय हा होताच. भांडणात तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत तिला नको नको ते बोलून तिला खालच्या पातळीवर बोलत होता. देखणी बायको दुसऱ्याची असते तसेच त्याचे झाले होते. चित्राचा स्वाभव हा हसरा आणि मनमोकळा असल्याने ती कोणाबरोबर ही बोलताना हसत खेळत बोलत होती. याचा नेमका वेगळा अर्थ शिवकुमारने लावला होता.तो तिला तुझे दुसऱ्याशी संबंधच आहेत असे म्हणत तिच्याशी वाद घालत होता. त्याचे मारहाण आणि अत्याचार करण्याचे प्रमाण वाढल्यावर तिने ही याबाबत आपल्या माहेरच्या लोकांना बोलावून घेऊन नवरा शिवकुमार याला समजावण्यास सांगितले होते. त्यावेळी पाहुण्याच्यासमोर त्याने फक्त आपली मान हालवून आपण परत पत्नी चैत्रावर संशय घेणार नाही असे सांगितले.तसेच त्याने आपण परत दारू ही पिणार नसल्याचे सांगून त्यांच्या होकारात होकार मिसळला. परंतु काही दिवसानंतर मात्र त्याचे पुन्हा मागचे तसे सुरू झाले. त्याच्या मारहाणीला आणि अत्याचाराला ती आधीच कंटाळलेली होती. एक तर त्याचा तापट आणि संशयखोर स्वभाव तिला आवडत नव्हता.दररोजच्या भांडणाला ती कंटाळलेली होती. तिला ही काय करावे काय नको असे झाले होते. त्यातच त्याने तिला नोकरी ही सोडयला लावलेली होती. त्यामुळे तिचा ही हिरमोड झाला होता. संशयी वृत्तीने नवऱ्याने आपले कशात काय नसताना नोकरी सोडायला लावल्याने ती ही त्याचेवर चिडली होती. आता तर ती घरीच राहत होती. तरी ही तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत तिला मारझोड करीत होता. ती मोबाईलवरून कधी कोणशी काय संपर्क साधते काय बोलते याकडे त्याचे बारीक लक्ष होते. अर्थात घरात राहून ही त्याने तिच्या खऱ्या स्वात्यांवर ही निर्बंध आणले होते. तिला तर आता आपण कशासाठी जगतो आहोत असे वाटत होते. त्या दोघांची भांडणे विकोपाला गेली होती. पै-पाहुण्यांनी त्याच्या भांडणात मध्यस्थी करून ही त्यांची भांडणे मिटत नव्हती.या कारणातून तिने नवऱ्यापासून सुटका मिळविण्यासाठी म्हणून होलेनरसीपूर कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज केला होता. तेथे तिने घटस्फोटासाठी दावा दाखल करून पोटगी साठी ही अर्ज केला होता.आता ती आपल्या माहेरीच दोन्ही मुलांना घेऊन राहत होती. पत्नी माहरी राहत असल्याने व तिने आपल्या विरूध्द कोर्टात दावा दाखल करून पोटगी साठी अर्ज केल्याने तो आधिकच तिच्यावर भडकला होता. एकदा दोनदा त्याने तिच्या माहेरी जाऊन तिला धमकावत दोन्ही मुलांचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. परंतु तिने व तिच्या माहेरच्या लोकांनी त्याचे काहीच चालू दिले नाही. पत्नी माहेरी राहून देखील आपल्याला वरचढ ठरत आहे याचा त्याला भयंकर राग आला होता. मध्यतंरी त्याने ही कोर्टात केस असताना ही आपल्या मध्यस्था मार्फत नांदण्यास येण्यास सांगितले होते. परंतु तिचा त्याने विश्वासघात केल्याने ती काही त्याचेबरोबर नांदण्यास तयार झाली नाही. तिला काय ते कोर्टामार्फत करायचे असल्याने ती कोर्टाचा निर्णय मानणार होती. बायको नांदण्यास येत नसल्याने तो ही सैरभैर झाला होता. त्याला आता बायकोची किंमत कळाली होती.तो समेटासाठी प्रयत्न करीत होता. ती मात्र समेटासाठी तयार नव्हती. याचा त्याने वेगळाच अर्थ काढत तिला बदनाम करण्यासाठी म्हणून तो सगळ्याना सांगू लागला की तिचे बाहेरच्या तरूणाबरोबर लफडे आहे म्हणून ती माझ्यासोबत नांदत नाही. घटस्फोटाचा निकाल देण्यासाठी कोर्टाकडून दोघांचे ही समपदेशन करण्यात येत असते तसे समुपदेशन त्या दोघांचे एक दोन तारखेला झाले होते.तेथे ही त्यान दोघांनी ही मुलांच्यासाठी एकत्र येतो असे सांगितले होते. दोघे ही परत संसारला तयार असल्याने न्यायालयाने ही त्यांना सुधारण्याची संधी देत सहा महिने एकत्र राह मग घटस्फोटाचा विचार करू असे सांगितले. दि.१६ ऑगस्ट २०२२ रोजी ते दोघे ही होलेनरसीपूर कोर्टात सकाळी आले.तेथे दोघेचे परत एकदा कौन्सिलिंग झाले होते. या दिवशी शिवकुमार हा भलताच रागात होता. त्याने तसा राग कोर्टात दाखविला नव्हता. वकिलांच्या समोर त्याने प्रत्येक गोष्ट मान्य केली होती. पत्नी चैत्र हिला नांदविण्यास तयार आहे असे ही सांगितले. कोर्टाने दोघांनाही नाते टिकविण्यासाठी एक संधी दिली होती. त्या संधीचा दुरूपयोग करू नको चांगले राह मुलाच्याकडे लक्ष दया असे सांगितले होते.त्यादोघांनी ही न्यायालयाचा सल्ला मानला होता. तसे ते दोघे ही कोर्टातून बाहेर पडले. कोर्टाच्या बाहेरच्या आवारात गर्दी होती. गर्दीतून वाट काढत चैत्र ही स्त्री प्रसाधान कडे चालली होती. तिच्या मागून रागाच्या भरात शिवकुमार हा चालला होता.त्याच्या मनात वेगळेच काही तरी होते. ती स्त्री प्रसाधानकडे लगबीगने चालली होती. पाठीमागून घाई गडबडीत शिवकुमार येत त्याने तिला हाक मारली ती मागे वळून पाहत असतानाच रागाच्या भरात शिवकुमारने आपल्या खिशातील चाकू बाहेर काढला आणि सपासप असे वार तिच्या मानेवरती केला.तशी ती जोरात ओरडत खाली पडली. त्याने इतक्या जबर वार केले होते. की तिचा गळा त्या धारदार शस्त्राने चिरला होता. तिच्या गळ्यातून रक्ताच्या चिळकांडी उडली होती. ती जागीच ओरडत पडली.तिच्या ओरडण्याच्या आवाजाने आजुबाजूचे लोक ही जमा झाले. या घटनेनंतर शिवकुमार हा पळून जाण्याच्या तयारीत होता. त्याच्या हातात रक्ताने माखलेला चाकू होता. तो जवळ येणाऱ्या लोकांना धमकावत होता. त्याच्या चेहऱ्यावर संताप दिसत होता. तो लोकांना ही माझी बायको आहे. हिने मला धोका दिला आहे म्हणून मी तिचा खून केला आहे असे सांगत कुणी ही माझ्याजवळ येवू नका. नाही तर मी तुमचा ही खून करेन असे सांगत होता. तरी ही काही धाडसी तरूणांनी त्याला त्या अवस्थेत ही पकडून पोलीसांच्या ताब्यात दिले. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन घटना स्थळावर गंभीर जखमी अवस्थेत पडलेल्या चैत्राला लागलीच एका दवाखान्यात दाखल केले. तर दुसऱ्या बाजुला पोलीस घटनास्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती शिवकुमार याच्याकडून घेत होते. त्याने ही पोलीसांना आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली. ही घटना त्याने पुर्वनियोजीत पध्दतीनेच केली आहे असा संशय पोलीसांचा आहे कारण कोर्टाच्या आवरात कोणाला ही कोणतेही धारदार शस्त्र नेता अथवा आणता वापरता येत नाही त्याने ज्यावेळी पत्नी चैत्रवर धारदार शस्त्राने वार केला त्यावेळी तो कोर्टाच्या आवरात होता. त्याने पॅन्टेच्या खिशातून विचारपुर्वकच धारदार चाकू आणला होता.त्याची माहिती त्याचे शिवाय इतर कोणालाच नव्हती.इकडे या घटनेची माहिती मयत चैत्र हिच्या नातेवाईकांना दिल्यावर ते ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ही पोलीसांना शिवकुमार हा पत्नी चैत्रवर चारित्र्याचा संशय घेत तिला मारहाण करीत असल्याने तिने घटस्फोटासाठी कोर्टात अर्ज केल्याचे सांगितले. मयत चैत्र हिच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी चैत्र (वय ३०) हिच्या खून प्रकरणी तिचा पती शिवकुमार (वय ३३) याच विरूध्द आयपीसी कलम ३०२ प्रमाणे खूनाचा गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी जेलमध्ये केली. या घटनेचा पुढील तपास वरिष्ट पोलीस अधिकारी हरीराम शंकर याच्या मार्गदर्शानाखाली होलेनरसीपूर पोलीस करीत आहेत. पती पत्नीचे भांडण विकोपाला गेले की त्यातून ते दोघे ही संसार वाचविण्याचा प्रयत्न करीत नाहीत उलट एकमेकावर आरोप प्रत्यारोप करीत तो वाद अधिकच चिघळत ठेवतात आणि मग त्यातून विभक्त होण्यासाठी म्हणून कोर्टाची पायरी चढतात त्यातून निषपन्न तरी काहीच होत नाही उलट होत ते इतके भयानक की काही विचारण्याची सोय नसते. म्हणूनच संसार हा विश्वासावर होत असतो एकदा का या विश्वासाला तडा गेला की त्यातून खूनाची घटना ही घडतेच हेच या घटनेवरून दिसून येते.

# बनावट सोने खरे असल्याचे भासवून फसवणूक करणाऱ्या टोळीला चाकूर पोलिसांकडून अटक!



**लातूर/करकरे अंबादास**

उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्याकडे एका तक्रारदाराने माहिती दिली की, काही महिला व पुरुष त्याला कमी दरात दहा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने विकण्याचा प्रयत्न करीत आहेत. ते लोक माझी फसवणूक करतील याबद्दल मला संशय निर्माण झाला असून सदरच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार आजच संध्याकाळी सहा वाजता होणार आहे.अशी माहिती दिली. त्यावरून सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी चाकूर पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करून माहिती मधील ठिकाणी सापळा लावण्यात आला. सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास सोन्याची देवाणघेवाण होत असताना पोलिसांचा संशय आल्याने सदरच्या टोळीतील सदस्यांनी तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, आजूबाजूला दबा देऊन बसलेल्या पोलिसांनी त्यांना पकडले. त्याच्या जवळ असणाऱ्या पिशवीची तपासणी केली असता त्याच्याजवळ पिवळ्या धातूचे दागिने सापडले. पोलिसांनी टोळीतील सदस्यांना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, आम्हाला पैशाची गरज असल्याने आम्ही हे सोने कमी किमतीत विकायचे आहे असे सांगत ग्राहकाला खोटे सोने विकणार होतो. अशी कबुली दिली. त्यावरून नमूद टोळीतील आरोपीचे जया दीपक शिंदे, वय ३५ वर्ष, राहणार विठ्ठल नगर, तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद, शीला तपास भोसले, वय ३७ वर्ष, राहणार विठ्ठल नगर, तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद, शुक्सला समाधान काळे, व ३९ वर्ष, राहणार मोतीहरा तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद, राम मारुती कोकरे, वय २६ वर्ष, राहणार कोरेवाडी तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद, सुरज समाधान काळे, २१वर्ष, राहणार कुंभारी तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद, सुनील सिताराम भोसले,६१ वर्ष राहणार मोतीझरा गल्ली, तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद. यांचे विरुद्ध पोलीस ठाणे चाकूर येथे दिनांक २६/०८/२०२२ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०७/२०२२, कलम ४२०,५११,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्यात नमूद आरोपींना अटक करण्यात आले असून त्यांच्याकडील बनावट सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास चाकुर पोलीस करीत आहेत. बनावट सोन्याची विक्री करणाऱ्या आणखीन टोळ्या सक्रीय असल्याची शक्यता नाकारता येत नसून सदरच्या टोळ्या मधील सदस्य प्रथमता खरे सोन्याचे दागिने दाखवून खरेदी-विक्रीचा व्यवहार फिक्स करतात.जेव्हा ग्राहक आमिषाला बळी पडून स्वस्तात सोने घेण्यासाठी येतो तेव्हा घाई गडबड करून किंवा पोलीस आल्याचा बनाव करून गोंधळाची परिस्थिती निर्माण करतात व घाई गडबडीत बनावट सोने देऊन पैसे घेऊन पळून जातात प्रसंगी ग्राहकास मारहाण सुद्धा करतात. त्यामुळे नागरिकांनी स्वस्तात सोने मिळत असल्याच्या आमिषाला बळी पडू नये. असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात येत आहे. सदरची कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे मार्गदर्शनात चाकूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी मोहिते व पथकातील पोलिसांनी केली आहे.

# भिवंडीत महागड्या सायकलींची चोरी करणारे अल्पवयीन आरोपी ताब्यात!



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरात मागील काही दिवसात गृहनिर्माण सोसायटींच्या आवारातून महागड्या सायकली चोरीच्या घटना वाढल्या असताना त्यांच्या तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल होत नव्हत्या. परंतु नुकताच भोईवाडा पोलीस ठाण्यात दाखल सायकल चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी दोघा अल्पवयीन चोरट्यांना ताब्यात घेत त्यांच्याकडून २ लाख १४ हजार रुपये किमतीच्या १२ महागड्या सायकली जप्त करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. बुधवारी सायंकाळी धामणकर नाका परिसरातील मामा पावभाजी सेंटर येथे पावभाजी खरेदी करण्यासाठी अरविंद अग्रवाल हा सायकल घेऊन आला होता.सायकल रस्त्यावर पार्किग करून पावभाजी सेंटर मध्ये ऑर्डर देत असताना पंधरा मिनिटाने त्याठिकाणी आला असता सायकल चोरीस गेल्याचे आढळून आले. त्यांनी लागलीच भोईवाडा पोलीस ठाण्यात या बाबत तक्रार दिली. पोलीस पथकाने गुप्त बातमीदाराच्या मदतीने तपास सुरू केला असता भंडारी कंपाऊंड येथील सदानंद हॉटेल येथे दोन संशयित सायकल घेऊन उभे असल्याची माहिती मिळाली.पोलीस पथकाने लागलीच त्या ठिकाणाहून दोघा अल्पवयीन संशयित यांना ताब्यात घेत त्यांच्या कडून चोरीस गेलेल्या सायकल सह अजून एक अशा दोन सायकली हस्तगत केल्या.त्यानंतर या दोघांकडे कसून चौकशी केली असता त्यांच्या ताब्यातून २ लाख १४ हजार रुपये किमतीच्या एकूण १२ सायकली जप्त केल्या आहेत.विशेष म्हणजे विधिसंघर्षग्रस्त बालकास व्हिडीओ रील बनविण्याची हौस असून त्यासाठी महागडा मोबाईल खरेदी करण्याच्या इराद्याने तो या महागड्या सायकली चोरी करीत असल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे.



## गुरे चोरणारी टोळी वाडा पोलीस ठाण्यात जेरबंद

वाडा : जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून गुरे चोरून कत्तलखान्यात विकणाऱ्या टोळीला वाडा पोलीस ठाण्यात गजाआड करण्यात आले आहे. गुरुवारी पहाटेच्या सुमारास गुरे चोर व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये फिल्मी स्टाईल चकमक झाली होती या चकमकीत वनविभागाच्या दोन वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या चकमकीत सहा जणांना अटक केली आहे तर दोघे जण पळून गेले आहेत. याप्रसंगी जप्त केलेल्या जीप मध्ये पाच म्हैशी व एक गाय आढळून आले आहेत. वन विभागाने वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला असून त्या अनुषंगाने या आरोपींना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. सरफराज शेख, अनिकेत पाटील, अशरफ शेख, इब्राहिम पठाण, फय्याज शेख, शोएब शेख अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. ही सर्व वसई, भिवंडी व नाशिक येथील रहिवासी असून यांनी अगोदरही गुरे चोरण्याचे गुन्हे केले असल्याची शक्यता असून लवकरच इतरही गुन्हे उघडकीस येतील अशी माहिती पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी दिली.

## कर्जबाजारी शेतकऱ्याचा विहिरीत आढळला मृतदेह!



**देवणी** : देवणी तालुक्यातील इस्मालवाडी शेत शिवारात ऐन बैलपोळा दिवशीच म्हणजे शुक्रवार दि.२६ ऑगस्ट रोजी सकाळी कर्जबाजारी शेतकरी सोमनाथ विरभद्र पाटील वय ३४ वर्षे यांचा स्वतःच्या विहिरीत कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने गावात शोककळा पसरली. शेतकरी सोमनाथ पाटील यांना चार एक्कर शेती असून त्यांच्यावर जिल्हा बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा दिड ते दोन लाख रुपये कर्ज व तसेच सावकारीतून घेतलेला एक ते दिड लाख रुपये कर्ज आणि त्यात अतिवृष्टी व गोगलगाय गायीने खरीपाचे पिक होत्याचे नव्हते केले. परिणामी आता जगायचे कसे या विवंचनेत असलेल्या मयत सोमनाथ पाटील यांनी नैराश्यातून आलेल्या वैफल्यग्रस्त मानसिकतेतून सोमवारी स्वतःच्या विहिरीत अंगाला दगड बांधून उडी घेतली असावी कारण सोमवारपासून ते बेपत्ता होते. अशी माहिती ग्रामस्थांच्या चर्चेतून समोर आली. मयत सोमनाथ पाटील यांचे मृतदेह कुजलेल्या अवस्थेत पाण्यावर तरंगत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी येत असल्याने शेजारच्या शेतकऱ्यांनी पाहिले असता सदरील घटना उघडकीस आली. घटनास्थळी देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज शिंगारे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक डोंगरे व आदी पोलिसांनी धाव घेऊन पाहणी केली व घटनेचा पंचनामा करून शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या सुपुर्द करण्यात आले. मयतावर शोकाकुल वातावरणात दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात आक्समिक मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे. मयताच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ, एक बहिण, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

## हनुमंत कसबेंच्या स्मृतिदिनी १०७ युवकांचे रक्तदान



औसा : औसा नगर परिषदेचे दिवंगत कर्मचारी हनुमंत सदाशिव कसबे यांच्या १७ व्या स्मृतीदिनानिमित्त फ्रेंड्स क्लब औसा व मित्र मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरामध्ये शुक्रवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी १०७ युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून राष्ट्रीय कार्यात हातभार लावला या शिबिराचे उद्घाटन जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उदगे, काँग्रेसचे प्रदेश सचिव अमर खानापुरे, शहराध्यक्ष शेख शकील, युवक काँग्रेसचे ड.दीपक राठोड, नगरसेवक अंगद कांबळे, ओबीसी काँग्रेसचे विभागीय अध्यक्ष प्रा.सुधीर पोतदार यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करून संपन्न झाले. हनुमंत कसबे यांच्या स्मृतिदिनानिमित्त मागील १७ वर्षापासूनची अखंड परंपरा कायम राखत फ्रेंड्स क्लबच्या पुढाकाराने अण्णाभाऊ साठे चौका नजीक असलेल्या सांस्कृतिक सभागृहामध्ये या शिबिराचे नियोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये तरुणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सहभाग नोंदविला या शिबिराच्या यशस्वीतेसाठी युवक काँग्रेसचे जयराज कसबे, माजी नगरसेविका मंजुषा हजारे, पवन कांबळे, गणेश कसबे, सकीब शेख, अलताफ शेख, ओबीसी काँग्रेसचे शहराध्यक्ष भागवत म्हेत्रे, विलासराव देशमुख युवा मंचचे शहराध्यक्ष खुंदमीर मुल्ला, कार्याध्यक्ष नियमत लोहारे, जयराज ठाकूर, युवराज सरवदे, प्रसाद पूड, सतीश जाधव, गणेश कसबे, अजय कसबे, रवी चव्हाण, हमीद सय्यद, यांच्यासह अनेकांनी सहकार्य करून रक्तदात्यांना रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित केले.

# देवणी तालुक्यात बैल पोळा उत्साहाने साजरा



**देवणी/प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देवणी तालुक्यात दरवर्षी पिठोरी अमावस्येच्या श्रावणातील शेवटचा सन म्हणून या दिवशी बैल पोळा सण साजरा केला जातो. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैल पोळा हा सण साजरा केला जातो. यावर्षी बैलपोळा २६ ऑगस्ट रोजी २०२२ तालुक्यातील प्रत्येक गावात दुष्काळाच्या सावटाखाली का होईना पण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यांत आला. या दिवशी बैलांना शेतीतील कामांपासून आराम देऊन बैलाना पोळ्याच्या निमित्ताने नदीवर किंवा तलावावर नेऊन उटणे आणि साबण लावून स्वच्छ आंघोळ घालून त्यानंतर विविध रंगांनी त्यांना सजवून, बैलांना आकर्षक वस्त्र, झुली मटाट्या, म्होरकी, कंडे, घागरमाळे, घालून गावातील हनुमान मंदीराच्या प्रदक्षिणा घालून त्यांची मोठ्या हौसेने वाजत गाजवत मिरवणूक काढून विधिवत पूजा करून पुरण पोळी चारून बैलाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्यासोबत वर्षभर शेतीची धुरा वाहणाऱ्या बैलांला पोळ्याच्या दिवशी विशेष मान दिला जातो.या निमित्ताने गावात पशुधनाची संख्या वाढावी, दुभत्या जनावरांची निगा व्हावी व यंत्राच्या जमान्यात घटत चाललेले पशुधनाची वाढ व्हावी या उद्देशाने तालुक्यातील तळेगाव भो, चवणहीप्परगा या सारख्या बऱ्याच गावातून उत्कृष्ट पशुधन स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. यात तळेगाव व चवणहीप्परगा येथे स्व. रामचंद्रराव पाटील तळेगावकर प्रतिष्ठानच्या वतीने उत्कृष्ट बैल जोडी,गाय वळू ,रेडा,यांची निवड करून त्या पशुपालकाना सन्मान चिन्ह, प्रमाणात शाल श्रीफळ फेटा बांधून त्याचा सन्मान केला गेला. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ नागरीक किशनराव भाऊराव पाटील हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून निरिक्षक पशुधन अधिकारी डॉ.सिताराम केंद्रे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक भगवानराव पाटील तळेगावकर, भाऊसाहेब सहकारी बँकेचे मुख्याधिकारी एल एम कुलकर्णी, संस्थानचे अध्यक्ष बालाजी जाधव, देवणी नगरसेवक किशोर निडवंचे, पशुधन विकास अधिकारी डॉ. अजमत शेख, चेअरमन शंकरराव पाटील तळेगावकर, व्हा चेअरमन संतोष धनेगावे, सरपंच सदाशिव पाटील तळेगावकर, सुधाकर पाटील, रमेश ढवळे, प्रकाश पाटील, ज्ञानोबा विळेगावे, पोलीस पाटील संभाजी पाटील, धनाजी जाधव, आदीसह गावकरी पशुपालक उपस्थित होते. दरम्यान यावेळी रामचंद्रराव पाटील तळेगावकर प्रतिष्ठान च्या वतीने उत्कृष्ट बैलजोडी ३१००, तर द्वितीय २१०० व उत्कृष्ट देवणी गाय २१०० रूपये सन्मान चिन्ह प्रमाणपत्र व बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते पशुपालकाना सन्मानित करण्यात आले. तर प्रोत्साहनपर बक्षिसात उत्कृष्ट बैलजोडी, देवणी गाय, देवणी वळू, लावणीचा वळू, लावणीचा रेडा व कालवड यांच्यावय प्रोत्साहनपर बक्षिसाचा पाऊस पाडत ११ प्रोत्साहनपर बक्षिस जाहीर करून ते विजेत्याना देण्यात आली.

## भिवंडी पालिकेच्या अग्निशामक दलाच्या जवानांना राज्यस्तरीय समाजरत्न गुनिजन पुरस्कार २०२२ आयुक्तांच्या हस्ते प्रधान!



**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील जाकातनाका येथील महापालिकेच्या मुख्य कार्यालयात अग्निशामक दलाच्या जवानांना राज्यस्तरीय समाजरत्न गुनिजन पुरस्कार २०२२ महापालिका आयुक्त विजयकुमार म्हसाळ यांच्या हस्ते प्रधान करण्यात आला आहे. भिवंडी तालुक्यातील पडघा येथील गणेशनगर या ठिकाणी २१/०७/२१ रोजी पूरस्थिती निर्माण झाली असताना पुराच्या पाण्यातून ३५ ते ४० ते लोकांसह लहान मुले, महिला त्यांचे प्राण वाचविण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांचे बचाव कार्य भिवंडी महापालिकेच्या अग्निशामक दलाच्या जवानांनी केले होते याची दखल घेऊन मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी या संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न गुनिजन पुरस्कार २०२२ जाहीर केला असताना नितीन जयराम चव्हाण लिडींग फायरमन, शिशुपाल जानकीराम राठोड, रमेश सालकर, अविनाश गणपत शिर्के, नितीन गोविंद पष्टे या सर्व अग्निशामक दलातील फायरमन असेल्या कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट काम केल्याने महापालिका आयुक्त विजयकुमार म्हसाळ यांच्या हस्ते राज्यस्तरीय समाजरत्न गुनिजन पुरस्कार २०२२ प्रधान करण्यात आला आहे.

## बोरोळ येथे अण्णाभाऊ साठे जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**देवणी/प्रतिनिधी**

साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०२वी जयंती बोरोल येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, यांच्या प्रतिमेचे पुजन करून ध्वजारोहण बोरोळ गावचे चेअरमन संजय पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले, तसेच यावेळी अण्णाभाऊ साठे चौकाच्या नामफल काचे उद्घाटन पोलिस निरीक्षक गणेश सोंडारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यंकटराव देवणे तंटामुक्ती अध्यक्ष कृष्णा पाटील, माजी सरपंच ग्यानोबा बिरादार, राजकूमार पाटील, मा.सभापती सत्यवान कांबळे माधव बालूरे, सुनिल शेंडगे, बंकट तूरेवाले, दयानंद चाफे, उध्दव शिंदे पोलीस उपनिरीक्षक शेख, बिट अमलदार विनायक कांबळे, शिवाभाऊ कांबळे, रवि गायकवाड, रवि सूर्यवंशी वलांडीकर, जितेज रणदिवे, ग्रामसेवक विनोद खरात, पत्रकार लक्ष्मण रणदिवे, वसंत कांबळे आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रतन सूर्यवंशी दवणहिप्परगेकर यांनी केले. यावेळी गावातील नागरिक उपस्थित होते.

## भिवंडीत खरे पोलीस कोमात तर खोटे पोलीस जोमात; दोन महिन्यात २५ गुन्हे दाखल

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहर आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागात गेल्या दोन महिन्यात खोटे पोलीस बनुन व रस्त्यावर उभे राहून येणाऱ्या जाणाऱ्या ला थांबून व आम्ही पोलीस असल्याची बतावणी करून सोन साखळी, मोबाईल आणि पैशाची लूट करीत असल्याची एक सक्रिय टोळी झाली आहे. कल्याण येथील राहणारे सेवानिवृत्त कर्मचारी दिलीप तुकाराम भोईर हे भिवंडी शहरातील ताडाळी जकात नाका या ठिकाणी जकात नाक्या कडून पाईपलाईन रोडने भादवड नाक्याकडे येत असताना खोटे पोलिसांनी आम्ही खरे पोलिस आहे असे सांगून त्यांच्याकडून पैसे व २५ हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी काढून लुटण्यात आले आहे. याबाबत भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा सुद्धा दाखल करण्यात आला आहे. भिवंडी पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांच्या नियंत्रणा अभावी अशा प्रकारे गुन्ह्यामध्ये वाढ होत असल्याचे आरोप होत असून गेल्या दोन महिन्यात खोटे पोलीस असताना आम्ही खरे पोलिस आहे असे सांगून २५ गुन्हे दाखल झाले असल्याची माहिती समोर येत आहे. तर कित्येक गुन्हे पोलिसांनी बतावणी करून दाबले असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. त्याचप्रमाणे भिवंडीत चोरी, घरफोडी, बलात्कार, दरोडा, महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, सोन्याचे दागिने खेचून नेण्याच्या घटनात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहें असे एक ना अनेक गुन्हे गेल्या वर्षी व यावर्षी यात प्रचंड वाढ झाली असून गुन्हे नोंद झाल्याचे प्रमाण दुप्पट झाले आहे.संवेदशील अशा भिवंडी शहराला कर्तव्यदक्ष आणि चांगल्या उपायुक्तांचा इतिहास आहे. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था व नागरिकांना चांगल्या प्रकारे राहता यावे यासाठी राज्याचे गृहमंत्री यांनीच लक्ष देऊन योग्य तशी पोलिस यंत्रणा गुन्हेगारी रोखण्याचे काम करेल.

# महाराष्ट्रातले नवे मुंगेरीलाल!

रिकामी झोळी तरी राजेशाही थाट
खिशात नाही ** तरी कॉलर माझी ताठ!
सवंग घोषणा करून थोपटू स्वतःचीच पाठ
मुंगेरीलाल आम्ही लावू महाराष्ट्राची वाट!!

माणसाने नेहमी अंथरूण बघून पाय पसरायचे असतात. पण काही लोकांना मात्र अंथरूण कितीही तोकडे असले तरी त्यावर गडाबडा लोळायची सवय असते. खास करून अंथरूण जनतेच्या पैशाचे असेल तर त्यावर कसेही लोळता येते. महाराष्ट्राची आज अशीच अवस्था आहे. महाराष्ट्र आर्थिक दृष्ट्या सध्या कंगाल झालाय हे वास्तव राज्यकर्ते स्विकारायलाच तयार नाहीत. केवळ राज्यकर्तेच नाहीत इथली जनताही ते स्वीकारायला तयार नाही. सरकार कुठल्याही पक्षाचे असो सवंग लोकप्रियतेसाठी मोठ मोठ्या घोषणा केल्या जातात, पण त्याची अंमलबजावणी करण्याची वेळ येते, तेंव्हा आपला खिसा फाटका आहे याची त्यांना जाणीव होते. महाराष्ट्रात शेतकरी कंगाल झालाय. एसटी कामगारांनी ५ महिने संप करूनही त्यांच्या प्रमुख मागण्या मान्य झाल्या नाहीत. काय तर म्हणे सरकारकडे पैसा नाही. जर सरकारकडे पैसा नसेल तर पोलिसांना १५ लाखांत घरे कशी देणार? याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी द्यायला हवे. कोणतीही घोषणा करताना आपण जपानचे पंतप्रधान नाही, तर कर्जबाजारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहोत याचे भान ठेवणे गरजेचे होते. पण दुर्दैवाने पूर्वीचे सत्ताधारी किती वाईट होते आणि आम्ही किती चांगले आहोत हे दाखवण्यासाठी मोठमोठ्या घोषणा करायच्या आणि नकोती स्वप्ने दाखवून महाराष्ट्राला मुंगेरिलाल बनवायचे हे कुठे तरी थांबायला हवे. काही लोक असे असतात की त्यांना फुशारक्या मारण्याची सवय असते. उदाहरणार्थ एखादा प्रेमवीर! त्याला जर एखादी मुलगी पटवायची असेल तर आपण किती श्रीमंत आहोत आणि आपली काय ऐट आहे ते दाखवून त्या मुलीसमोर शायनिंग मारीत असतो. त्यासाठी भाड्याच्या कपड्यांपासून भाड्याच्या बाईक पर्यंत सर्व काही करायची तयारी असते, पण हा भपका जास्त दिवस चालत नाही. कारण ज्या दिवशी पोलखोल होते तेंव्हा तोंड लपवयलही जागा राहत नाही. म्हणूनच माणसाने अंथरूण बघून पाय पसरावे. कारण माणसाने किती जरी श्रीमंतीचा आव आणला तरी लोकांना त्याची असलीयत ठाऊक असते. सध्या महाराष्ट्र सरकारची अशीच अवस्था झाली आहे. सरकारवर ५ लाख कोटींचे कर्ज आहे आणि या कर्जामुळे कर्मचाऱ्यांचा पगार देण्यासाठी सुद्धा सरकारला बँकेकडून ओव्हर ड्राफ्ट घ्यावा लागतोय. पैशा अभावी अनेक प्रकल्प आणि जनहिताच्या योजना धूळ खात पडल्या आहेत. असे असताना बिडीडी चाळीच्या पुनर्विकासाची योजना मागील सरकारने हाती घेतली आणि तिथल्या लोकांना ५० लाखात घर देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर राज्यात सत्तांतर झाले आणि नव्या सरकारने बिडीडी चाळीतल्या लोकांना २५ लाखांत घर देण्याचे आश्वासन दिले. हे कमी पडले की काय म्हणून आता पोलिसांना १५ लाखांत घर देण्याची घोषणा सरकारने केली आहे. १५ लाखांत आजकाल झोपडे सुद्धा मिळत नाही आणि सरकार पोलिसांना १५ लाखांत घर देणार आहे. आणखी काही दिवसांनी हीच किंमत साडेसात लाख केली जाईल आणि पुढच्या निवडणुकीपर्यंत पोलिसांना मोफत घरे दिली जातील अशी घोषणा केली जाईल. ज्या घराची कन्स्ट्रक्शन कॉस्ट १ कोटी ५ लाख आहे ते घर जर सरकार १५ लाखात देऊन प्रत्येकी ९० लाखांचा तोटा सहन करणार असेल तर अगोदरच कंगाल असलेल्या सरकारच्या तिजोरीवर किती कोटींचा बोजा पडणार आहे याचा शिंदेंनी विचार केला आहे का? अहो साध्या रिक्षासाठी कर्ज घेतल्यावर ते फेडताना रिक्षा चालकांच्या किती नाकी दम येतो हे कधी काळी स्वतः रिक्षा चालवणाऱ्या मुख्यमंत्र्यांना ठावूक असायला हवे होते. पण या सगळ्या गोष्टींचा ते कशाला विचार करतील. कारण सत्तेत गेल्यावर 'जनता का माल ** का बाल' असा प्रत्येक पक्षाचा आणि त्या पक्षाच्या मुख्यमंत्र्यांचा हिशोब असतो. त्यामुळे त्यांना घोषणा करायला काय त्यांच्या जनहिताच्या घोषणा या फक्त मत पेटीवर डोळा ठेऊन केलेल्या असतात. त्यामुळे वास्तवतेशी त्यांना काहीच घेणे देणे नसते. म्हणूनच सरकारला खड्ड्यात घालणाऱ्या अशा घोषणा केल्या जातात. सरकारकडे पोलिसांना १५ लाखांत घरे देण्याएवढं पैसा असेल तर जळगाव आणि इतर ठिकाणचे सरकारी गृहनिर्माण प्रकल्प का रखडले आहेत याचे उत्तर सरकारने द्यावे. सरकारी तिजोरी रिकामी असताना पोलिसांना १५ लाखांत घरे देण्याची घोषणा करणे म्हणजे पाकिस्तानने अमेरिकेला कर्ज देण्याची घोषणा करण्यासारखे आहे. असो असंगाशी संग केल्यावर शिंदे असेच करणार! कारण लोकांच्या खात्यात १५ लाख टाकण्याची घोषणा करणाऱ्या मोदींच्या भाजप सोबत ते सद्या आहेत. त्यामुळे उद्या त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला ताजमहल आणून देऊ असे जरी त्यांनी सांगितले तरी विश्वास ठेवायला हवा. कारण ठाकरे म्हणतात त्याप्रमाणे शिंदे कंत्राटी आहेत आणि कंत्राटी मजूर असो अधिकारी असो की मुख्यमंत्री असो त्याने फक्त मालक सांगेल ते ऐकायचे असते. आणि मालक शेजारी बसलेले असतात ते ज्या दिवशी ओम फट स्वाह म्हणतील त्या दिवसापासून शिंदे पुन्हा ठाण्याच्या रिक्षा स्टँडवर दिसतील. असो जनतेला त्याच्याशी काहीच घेणेदेणे नाही. पण राज्यावर कर्जाचा डोंगर असताना उधळपट्टी करण्याचा हा खटाटोप कशासाठी? बरे तुम्ही पर्मनंट सुद्धा झालेले नाहीत. ज्या दिवशी न्यायालय तुम्हाला अपात्र घोषित करील त्यादिवशी तुम्हाला सत्तेतून पायउतार व्हावे लागेल. मग कशाला महाराष्ट्रावर आणखी कर्जाचा डोंगर वाढवणाऱ्या घोषणा करता? शिवसेनेतील फुटिरांचे भवितव्य काय आहे ते संपूर्ण महाराष्ट्राला ठावूक आहे. त्यामुळेच चार दिवसांची जी सत्ता मिळाली आहे तिचा काहीतरी चांगला उपयोग करा. महागाई, आरोग्य, रोजगार आणि शेतकऱ्यांच्या हाताशी संबंधित प्रश्नांकडे लक्ष द्या, तरच लोक तुम्हाला लक्षात ठेवतील आणि चार दिवसांचे पाहुणे बरे होते असे म्हणतील. अर्थात तुम्ही काय करायचं तो तुमचा प्रश्न आहे. फक्त फक्त महाराष्ट्राच्या जनतेच्या डोक्यावर आणखी कर्जाचा बोजा वाढवू नका, एवढच लोकांचं म्हणणं आहे!

# शिक्षा माफी धोरणामुळे पिडितांवर अन्याय होतो का?



देशामधे बलात्काराच्या गुन्ह्यांमधे सातत्याने वाढ होत असताना आणि या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कायद्यांचा उपाय सरकारांकडून योजला जात असताना, गुजरातमधे घडलेली एक घटना विरोधाभास दर्शवणारी आहे. २००२ साली झालेल्या गुजरात दंगलीदरम्यान बिल्कीस बानोच्या चार वर्षाच्या मुलीला तिच्यासमोर आपटून ठार करण्यात आले. बिल्कीसच्या कुटुंबातील सात जणांची हत्या झाली. तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. तेव्हा बिल्कीस पाच महिन्यांची गर्भवती होती. या अत्याचारातून कशाबशा वाचलेल्या बिल्कीसने न्यायालयाचे दरवाजे ठोठावले.

## दिशायन

आरोपींना २००४ मध्ये अटक करण्यात आले होते. नंतर, हे प्रकरण मुंबईतील न्यायालयात वर्ग करण्यात आले. २१ जानेवारी २००८ मध्ये तिच्यावरील बलात्कार आणि तिच्या कुटुंबातील सात सदस्यांच्या हत्येप्रकरणी ११ जणांना विशेष सीबीआय न्यायालयात जन्मठेपेची शिक्षा सुनावली गेली. मुंबई उच्च न्यायालयानेही ही शिक्षा कायम ठेवली होती. बिल्कीस प्रकरणात ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. जन्मठेप ही आयुष्यभर तुरुंगात राहण्याची शिक्षा असते. पण गुजरात राज्याच्या ९ जुलै १९९२ च्या माफी धोरणानुसार १४ वर्षांनंतर आरोपींचे वर्तन विचारात घेऊन आणि केंद्र सरकारची परवानगी घेऊन राज्य सरकार शिक्षेचा पुनर्विचार करू शकते. परंतु, केवळ काही गुन्ह्यांच्या बाबतीत हे धोरण लागू होते. बलात्कारासारख्या गुन्ह्याच्या बाबतीत नाही. ११ जणांमधील राध्येश्याम भगवानदास या आरोपीने कलम ४३२ आणि ४३३ अन्वये १५ वर्षे ४ महिन्यांचा तुरुंगवास भोगला होता. त्याने पुढील शिक्षा माफ व्हावी यासाठी गुजरात उच्च न्यायालयात अर्ज केला, मात्र तेथे निर्णय झाला नाही. यामुळे त्याने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली .त्याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने हा गुन्हा गुजरातमध्ये घडला असल्यामुळे, गुजरात सरकार निर्णय घेऊ शकते, असे म्हटले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, गुजरात सरकारने एक समिती स्थापन केली. या समितीतील सदस्यांनी एकमताने या आरोपींची सुटका करण्याची शिफारस केली. मग गुजरात सरकारने सुटकेचे आदेश काढले आणि या ११ जणांची सुटका झाली. त्यानंतर या आरोपींचे हारतुरे घालून जंगी स्वागत करण्यात आले. मिठाई वाटली गेली. त्यामुळे संपूर्ण देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या दोषींना सोडण्याचा निर्णय घेणाऱ्या या समितीमधील दोन सदस्य हे भाजप आमदार आहेत. या समितीत असलेल्या भाजपच्या गोध्रा येथील आमदार, सी. के. राऊल यांनी तर त्यांच्या सुटकेनंतर असे विधान केले की ते लोक ब्राह्मण होते, त्यांचे संस्कार खूप चांगले होते. कदाचित वाईट हेतू ठेवून त्यांना शिक्षा करण्यात आली असावी. या ११ जणांच्या सुटकेनंतर बिल्कीस बानो यांनी आपल्या वकील शोभा गुप्ता यांच्यामार्फत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की या दोषींच्या सुटकेमुळे माझी शांतता दूर झाली आहे आणि माझा न्यायावरील विश्वास डळमळीत झाला आहे. नेमके त्याच दिवशी देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांबद्दल मानसिकतेत बदल करण्याचे आवाहन करून नारी शक्ती'चे समर्थन करण्याच्या गरजेवर भर दिला होता. विशिष्ट गुन्ह्यांच्या वर्गवारीनुसार शिक्षेमध्ये सूट देण्याचे तत्त्व वापरण्यात येते; पण हे तत्त्व इथे वापरले गेल्याचे दिसत नाही. त्यामुळे राजकीय स्वरूपाचा निर्णय म्हणून याकडे पाहिले जात आहे. अमानवी आणि गंभीर गुन्ह्यामधे दोषी ठरवण्यात आलेल्या तब्बल ११ गुन्हेगारांना एकाच वेळी चांगल्या वर्तणुकीचे कारण देत सोडणे, हे अमानुषतेला बढावा देणारे आहे, असे मत अ‍ॅड. सरोदे यांनी व्यक्त केले आहे. मुळात, कैद्यांची चांगली वागणूक याबाबत कोणतेही निकष नाहीत. त्यामुळे, शिक्षेत सूट देण्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. मागे संजय दत्तला चांगल्या वर्तणुकीचे कारण दाखवत, शिक्षेत सूट देण्यात दिली गेली होती. त्यावेळी त्याच्या चांगल्या वर्तणुकीमधे विणकाम करण्यासारख्या कामांचा दाखला दिला होता. वास्तविक, हे काम तुरुंगात शिक्षा भोगणारा प्रत्येक कैदी करतच असतो. त्याला चांगली वागणूक म्हणता येईल का? असा प्रश्न चर्चेत आला होता. या प्रक्रियेत सुसंगतता आणण्यासाठी, मानसोपचार तज्ज्ञांची एक समिती तुरुंगामध्ये असली पाहिजे आणि त्यांनी महिन्यातून एकदा-दोनदा कैद्यांशी संवाद साधला पाहिजे. त्यातून वर्तन परिवर्तन' होते आहे का याचे आकलन होईल, याचे विश्लेषण करून तशा कैद्यांची यादी तयार केली गेली पाहिजे. अशा कैद्यांच्या शिक्षेत कपात करून त्यांना समाजात सोडण्यास हरकत नाही, अशी शिफारस या समितीने केल्यानंतर निर्णय घेतला गेला पाहिजे. यासह मुख्य मुद्दा असा की, चांगल्या वागणुकीसाठी शिक्षेत माफी ही प्रक्रिया अधिक विचारपूर्वक राबवण्याची गरज आहे. कोणत्याही कैद्याला शिक्षेत सूट देताना गुन्ह्याचा प्रकार आणि त्या गुन्ह्यातल्या अन्यायग्रस्त व्यक्तींचा विचार प्राधान्याने झाला पाहिजे. कैद्यांच्या चांगल्या वागणुकीचं मूल्यांकन होऊन त्यांना शिक्षेत सूट देणं, ही पद्धती चांगुलपणावर विश्वास वाढवणारी आहे आणि ती पद्धत सुधारणा आणि पुनर्वसन' हे कारागृहाचं ब्रीद प्रत्यक्षात आणेल

# त्यापेक्षा त्यांना घरीच बसायला सांगाना!

## संध्या स्ट्रोक

**सोनू जाधव**

सवंग लोकप्रियतेसाठी सरकार काय काय करील याचा नेम नाही. पण त्यात देशाचे नुकसान होते त्याचे काय? सरकार न्यू लेबर कोड नावाचे एक विधेयक आणणार आहे. त्यात सरकारी कर्मचाऱ्यांनी आठवड्यातून फक्त चारच दिवस काम करायचे आहे. उर्वरित तीन दिवस त्यांना सुट्टी मिळणार आहे. देशातील सर्व शासकीय यंत्रणा आणि औद्योगिक क्षेत्र जर एक दिवस बंद राहिले तर अब्जावधी रुपयांचे नुकसान होते. सरकारचा कोट्यवधीचा महसुल बुडतो. अशावेळी जर आठवड्यातून ३ दिवस सरकारी सुट्टी असेल तर देशाचे किती आर्थिक नुकसान होईल याची कल्पनाही करवत नाही. एकीकडे देशाच्या एकूण महसुली उत्पन्नापैकी जवळपास ३५ ते ४० टक्के महासूल हा सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पेन्शन वर खर्च होतो. असे असताना त्यांना कामाच्या बाबतीतही आणखी सवलती कशासाठी? पंतप्रधान मोदी देशाला म्हणे आर्थिक महासत्ता बनणार आहेत. देशातील लोकांना अशा सुट्ट्या देऊन देशाचे उत्पादन बुडवून ते देशाला कसे काय आर्थिक महासत्ता बनणार आहेत तेच कळत नाही. अगोदरच सणवार, महापुरुषांच्या जयंत्या आणि पुण्यतिथी यांच्या सुट्ट्या दिल्या जात आहे. त्यात आणखी आठवड्यात एका सुट्टीची भर घालण्यापेक्षा या लोकांना घरातूनच काम करायला सांगाना! कार्यालयात येण्याचा त्रास तरी कशाला घेताय? बरे हे सरकारी कर्मचारी असं कोणत मेहनतीचं काम करतायत की ज्यामुळे त्यांच्यावर मोठा कामाचा ताण पडतोय? १०ची ड्युटी असेल तर १२ वाजता कामावर हजार होतात आणि ५ वाजयच्या आत सटकतात. तरीही त्यांना कामाचा त्रास होतोय. मग जे बिचारे अंग मेहनतीचे काम करतात त्यांचे काय? त्यांना फक्त आठवड्यातून एकच सुट्टी आणि सरकारी कार्यालयातल्या कमचोरणा आठवड्यातून तीन तीन सुट्ट्या हा कुठला न्याय? सध्या बायोमेट्रिक हजेरीमुळे सरकारी कर्मचारी वेळेवर तरी कामाला येतात, नायतर पूर्वी कित्येक कर्मचारी असे होते की कामावर न जाताही त्यांची हजेरी लागत असे आणि ते दुसरीकडे काम करून एकाच वेळी दोन ठिकाणचा पगार घ्यायचे. मिळालेल्या माहितीनुसार असे कितीतरी लोक आजही आहेत जे आपल्या वरिष्ठांना महिन्याला एक ठराविक रक्कम देऊन आपली हजेरी लावून घेतात. पालिकेच्या बी वार्ड मध्ये काही वर्षापूर्वी आरोग्य विभागात एक असा कर्मचारी होता जो १२ वाजता कामाला जायचं आणि ४ वाजता घरी जायचा. त्याच्या या ड्युटीचे त्याच्या मित्रांना आश्चर्य वाटायचे. पण एकदा तो मित्रांसोबत प्यायला बसला असता त्याने दारूच्या नशेत जो खुलासा केला तो भयानक होता. पालिकेच्या आरोग्य विभागासाठी जी औषधे येतात ती खाजगी दवाखान्यात किंवा मेडिकल स्टोअर्सना गुपचूप दिली जातात आणि त्याच्या वसुलीसाठी त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याची नेमणूक केली होती. त्यामुळे तो वसुलीसाठी १२ वाजता जायचा आणि ४ वाजता यायचा. असे भयंकर प्रकार सरकारी कार्यालयांमध्ये चालतात आणि तरीही जर सरकार त्यांच्यावर सवलतींचा पाऊस पडणार असेल तर सरकारला जाब विचारायची वेळ आली आहे. तसेच सरकारी कर्मचाऱ्यांच्या आठवड्यातून तीन दिवसांच्या सुट्टीला सर्वांनी विरोध करायला हवा! (७०२१४७६१५३)

# डेंग्यु ताप प्रतिबंधात्मक उपाययोजना



सध्या पावसाळयाचे दिवस असून डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याने त्यामुळे डेंग्यु, चिकुनगुन्यां आजाराचा प्रार्दूभाव वाढण्याची शक्याता नाकारता येत नाही. आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांचेमार्फत विविध भागात कंटेनर सर्वेक्षण करण्यात येत आहे. डेंग्यु ताप प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाय योजनेअंतर्गत लातूर शहर महापालिकेच्या वतीने दि.२२/०८/२०२२ ते दि. २८/०८/२०२२ या कालावधीमध्ये संपुर्ण शहरात अ‍ॅबेट मोहिम व धुरफवारणी मोहिमेचा पहिला राऊन्ड राबविण्यात येणार आहे.शहरातील एकूण अपेक्षीत घरसंख्या ७७५९७ आहे. यामध्ये आरोग्य कर्मचारी (पुरुष/स्त्रीया), आशा स्वतयंसेविका मार्फत घरोघरी जावून सांडपाण्याच्या टाक्यांतील पाणीसाठयात डासअळींची उत्पत्ती झाली आहे का याची तपासणी करुन आरोग्य शिक्षण व आवश्यकतेनूसार अ‍ॅबेट टाकण्याची कार्यवाही करण्याच येणार आहे.तसेच ज्यांचे घरी डासउत्पत्ती आढळून येईल त्यांना स्वतंत्र सुचनापत्र देण्यात येत आहे. तरी सर्व नागरीकांनी साठवलेले पाणी उघडे न ठेवता घट्ट झाकणाने सर्व पाणी टाक्या झाकून ठेवाव्यात. झाकण असलेल्याच टाक्यांचा वापर करावा. फुटक्या व झाकता न येवू शकणाऱ्या टाक्या वापरु नयेत व त्या विल्हेसवाटीसाठी घंटागाडीकडे द्याव्यात. टाक्यांना झाकणे नसल्यास झाकणे बसवूण घ्यावीत. निरुपयोगी, भंगार साहित्य छतावर, अंगणात न ठेवता ते घंटागाडी कडे, भंगार विक्रेत्याकडे द्यावे. नळाखाली, परीसरात खड्डे असल्यास बुजवून घ्यावेत. साचलेले पाणीकाढून टाकावे किंवा साचलेल्या पाण्यात खराब ऑईल, तेल टाकावे. फुलदाणीतील पाणी नियमितपणे बदलावे. कुलर व फ्रिजच्या डिफ्रॉट प्लेटमधील पाणी नियमीत बदलावे. शरीर झाकण्यासाठी पूर्ण बाह्याचे कपडे घालावेत. डास चावू नयेत म्हलणून लहान मुला-मुलींना लांब बाह्यांचे शर्ट व पॅन्ट, सलवार व कमीज, लेगीन्स या सारख्या् कपडयांचा वापर करावा. लहान मुलांना कोपऱ्यामध्ये, पलंगाखाली, अंधाऱ्या जागेत बसण्यास व खेळण्यासस प्रतिबंध करावा. खिडक्यां ना जाळया बसवून घ्याव्यात. सेप्टिक टँकच्या व्हेंट पाईपला जाळी बसवावी. झोपतेवेळी मच्छंरदाणीचा वापर करावा. ताप आल्यास त्वरीत दवाखान्यायत तपासणी करुन घ्यावी व वैद्यकीय उपचार घ्यावा. असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यांत येत आहे.

# लातूर जिल्हा होणार प्लास्टिक आणि कचरा मुक्त!

लातूर जिल्ह्यातील नागरिक कोणतीही गोष्ट विकासाला पूरक असेल तर तात्काळ स्विकरतात. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील सर्व नगर परिषदा आणि नगर पंचायती प्लास्टिक आणि कचरा मुक्त करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी घेतला असून जागतिक कीर्तीचे कचरा विघटन तज्ज्ञ रामदास कोकरे आता लातूर जिल्ह्याला नगर परिषद प्रशासन विभागाचे सह आयुक्त म्हणून लाभले असून त्यांच्या खांद्यावर ही जबाबदारी दिली असून त्यांनी दिनांक २३ ऑगस्ट रोजी निलंगा नगर परिषद आणि शिरूर अनंतपाळ नगर पंचायती पासून या कामाला धडाक्यात सुरुवात केली.येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती दिनी.. ही शहर कचरा मुक्त होतील असे नियोजन करण्यात आले आहे.

दापोली, वेंगुर्ला, कर्जत, कल्याण डोंबवली येथे रामदास कोकरे यांनी झिरो कचरा मुक्त मोहिम राबवून ती यशस्वी करून दाखविली आहे. त्यांच्या या मोहिमेची दखल जगाने घेतली असून देशात अनेक पुरस्कारानें त्यांना गौरविले आहे. त्याच पध्दतीचे नियोजन लातूर जिल्ह्यात राबविणार आहेत.आज पर्यंत सुका आणि ओला कचरा एवढेच आपण विघटन करत होतो. इथून पुढे सतरा प्रकारे कचऱ्याचे विघटन होईल त्यातून नगर परिषदेला उत्पन्नही मिळेल. भाजीपाला, अन्न घटक हे ओल्या कचऱ्यात जातील, सॅनिटरी पॅड आणि तत्सम वेगळा केला जाईल, पेपर रद्दी, फाटके चप्पल, टाकावू कपडे, लाईटचे घटक त्यात ट्यूब, बल्ब, याची व्यवस्था वेगळी करण्यात येईल.. घेताना पण हे घंटा गाडीत वेगळे घेता येईल.. यातील भाजी आणि अन्न घटक याचे कंपोस्ट खत बनविण्यात येईल.. सॅनिटरी पॅड आणि तत्सम गोष्टी नियमानुसार नष्ट करण्यात येतील.. फाटके कपडे, चप्पल, प्लास्टिक बॅग सारख्या गोष्टी पासून त्या त्या एजन्सीला विकून त्यातून नवनिर्माण होईल आणि नगर प्रशासनाचे उत्पन्न वाढेल अशी ही योजना आहे. दरम्यान मानवाच्या केसा पासून तुमच्या पायातील वाहना पर्यंतच्या गोष्टी विकत घेऊन त्यापासून नवीन वस्तू निर्माण करणाऱ्या कंपन्या आहेत. त्यामुळे तुमच्या घरातील प्रत्येक टाकावू असलेली गोष्ट आमच्याकडे येऊन मोल देणारी होईल असा ठाम विश्र्वास रामदास कोकरे व्यक्त करत आहेत. तसेच सर्व नगर परिषद आणि नगर पंचायत मध्ये मागच्या आठवड्या पासून प्लास्टिक बंदीचे बोर्ड लागले असून.. मुख्यतः कॅरी बॅग देणारे दुकानदार यांच्यावर आणि कॅरी बॅग मध्ये वस्तू घेऊन जाणाऱ्या नागरिकांवरही कारवाई केली जाणार असल्याचे या बोर्डवर नमूद केले असून पहिल्यांदा कॅरी बॅग आढळली तर पाच हजार दंड, दुसऱ्यांदा आढळली तर तर त्या पेक्षा वाढीव आणि तिसऱ्यांदा आढळली तर पंचवीस हजार दंड ठेवण्यात आला आहे. दरम्यान रामदास कोकरे यांच्या उपस्थितीत निलंगा येथे दंडात्मक कारवाई करून वेगवेगळ्या लोकांवर २५ हजार दंड ठोकण्यात आला. दरम्यान जनजागृतीसाठी सह आयुक्ताचा प्रत्येक शहरात दौरा आसणार आहे. रामदास कोकरे त्यांच्या कामातून बोलतात, त्यांनी केलेल्या कामाचे सादरीकरण दाखवतात, त्यात घनकचरा व्यवस्थापन म्हणजे काय, कचऱ्याचे मानवी जीवनावर आणि पर्यावरणावर होणारे परिणाम, सभोवतालाचे विद्रुपीकरण, कचऱ्याचे विघटन झाल्यानंतर वेंगुर्ल्यात पसरलेल्या कचऱ्याचे ढीग जाऊन तिथे फुललेली बाग, झिरो कचरा मुक्तीचा स्तंभ, प्रसन्न वातावरण, लोकांच्या कचरामुक्ती नंतरच्या प्रतिक्रिया.. कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे गाव सोडून जाणारे लोकं स्वतःचे बंगले बांधून राहू लागले अशा प्रतिक्रिया हे या सादरीकरणाचे बलस्थानें बघणाऱ्याला प्रेरणा देणारी ठरतात.. निलंग्यात तर लोकांनी हे सादरीकरण बघून टाळ्यांचा कडकडाट करून आम्ही आमचं शहर कचरामुक्त करण्याची आज पासून सुरुवात करतो अशी ग्वाही दिली. २५ ऑगस्ट रोजी शाळाशाळातून कचरा मुक्तीचा यज्ञ सुरु झाला.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अ‍ॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

29 AUGUST TO 04 SEPTEMBER 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 8/27/2022 9:16 PM Page 1



# 'महात्मा बसवेश्वर'मध्ये जिल्हास्तरीय देशभक्तीपर समूह गीतगायन स्पर्धा उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (अमृत महोत्सव समिती व संगीत आणि सांस्कृतिक विभाग), लातूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि लातूर जिल्हा भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात जिल्हास्तरीय देशभक्तीपर समूह गायन स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, उपकेंद्र, लातूर येथील संचालक डॉ.राजेश शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मा.माधवराव पाटील टाकळीकर हे होते तर विचारमंच्यावर प्रमुख अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ.रमाकांत घाडगे, जिल्हा समिती अध्यक्ष डॉ.राजेंद्र अवस्थी, स्पर्धाप्रमुख डॉ.संदीपान जगदाळे, प्रा.गोविंद घार, सिनेट सदस्य डॉ.दीपक चाटे, डॉ.संतराम मुंढे, डॉ.रमेश धनेश्वर, डॉ.अंजली जोशी, डॉ.केशव अनगुले, डॉ.भास्कर रेड्डी, परीक्षक सुरमणी भुजंग मुर्के, डॉ.दीपाली पांडे आणि डॉ.परांडे, प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, समन्वयक डॉ.श्रीकांत गायकवाड आणि समन्वयक डॉ.बाळासाहेब गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, मानवी जिवनामध्ये संगीताला अनन्य साधारण महत्व आहे. आपल्या महाविद्यालयात प्रा.विजयकुमार धायगुडे, प्रा.विश्वनाथ स्वामी आणि प्रा.गोविंद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संगीत विभाग नेत्रदीपक प्रगती साध्य करीत आहे तसेच मागील वर्षी आपल्याला विविध क्षेत्रामध्ये ०९ गोल्ड मेडल मिळाले आहे. उद्घाटकीय मार्गदर्शन करताना डॉ.राजेश शिंदे म्हणाले की, आपण यावर्षी आझादीका अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये सहभागी झालेल्या शहिदांना विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून अभिवादन करीत आहोत. यावेळी डॉ.राजेंद्र अवस्थी यांनी आपण सर्व या स्पर्धेमध्ये मोठया संख्येने सहभागी झालात याबद्दल आनंद व्यक्त केला. तसेच प्रा.गोविंद घार, डॉ.रमाकांत घाडगे आणि डॉ.श्रीकांत गायकवाड आदिनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले तर डॉ.संदीपान जगदाळे यांनी स्पर्धेचे नियम व अटी सर्वाना सांगितल्या. यावेळी अध्यक्षिय समारोप करताना संस्थेचे सचिव मा.माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवेश्वर यांच्या पावन विचारांची ही भूमी आहे. संगीत सर्वाना संस्कार देण्याचे महत्वाचे कार्य करते. आपन पदाधिकारी म्हणून काम न करता सेवक म्हणून कार्य केले पाहिजे असे सांगून आपली वैयक्तिक संपत्ती ही राष्ट्रीय संपत्ती मानले पाहिजे असेही ते म्हणाले. या स्पर्धेमध्ये महात्मा बसवेश्वर वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालय संघाला प्रथम क्रमांकाचे प्रत्येकी रुपये ३०००रु.चे पारितोषिक, तर दयानंद वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालय संघाला द्वितीय क्रमांकाचे प्रत्येकी रुपये २०००रु.चे पारितोषिक आणि राजर्षी शाहू वरिष्ठ महाविद्यालय संघाला तृतीय क्रमांकाचे रुपये १०००रु.चे पारितोषिक आणि सहभागी प्रमाणपत्र उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या संघास विद्यापीठस्तरीय स्पर्धेत सहभागी होता येईल. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हास्तरीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव समिती सदस्य डॉ.साईनाथ उमाटे, डॉ.विजेन्द्र चौधरी, डॉ.नारायण कांबळे, डॉ.नंदकुमार मगर, डॉ.बालाजी भुरे, डॉ.प्रमोद पाटील, डॉ.बालिका कांबळे, डॉ.मनोज रेड्डी, डॉ.गौरव जेवळीकर, डॉ.किरण गुट्टे, डॉ.नामदेव येमेकर, डॉ.सुदर्शन पेडगे, डॉ.नारायण सूर्यवंशी, सांस्कृतिक विभागातील डॉ.दिनेश मौने, डॉ.यशवंत वळवी, डॉ.जितेंद्र देशमुख, डॉ.शीतल येरूळे, प्रा.शिवशरण हावळे, प्रा.विजयकुमार धायगुडे, प्रा.विश्वनाथ स्वामी, डॉ.श्रद्धा अवस्थी, डॉ.उमा कडगे, प्रा.गीता गिरवलकर, प्रा.वैशाली जयशेट्टे, प्रा.गोविंद पवार आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालयीन स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव समिती सदस्य प्रोफेसर राजकुमार लखादिवे, डॉ.सदाशिव दंदे, डॉ.विजयकुमार सोनी, डॉ.मंतोष स्वामी, डॉ.शिवप्रसाद डोंगरे, डॉ.टी.घनश्याम, प्रा.आशिष क्षिरसागर, डॉ.राहुल डोंबे, प्रा.शंकर भोसले, प्रा.मारुती माळी, जलील सय्यद, शुभम बिराजदार, भीमाशंकर सुगरे यांनी सहकार्य केले. या स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून सुरमणी भुजंग मुर्के, डॉ.दीपाली पांडे आणि डॉ.परांडे यांनी काम पहिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.धोंडीबा भुरे आणि डॉ.अश्विनी रोडे यांनी तर आभार डॉ.रत्नाकर बेडगे यांनी मानले. या कार्यक्रमाला लातूर जिल्हास्तरीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव समितीतील सर्व पदाधिकारी, सांस्कृतिक विभागातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागृत मारूती मंदिरात हजारो भाविकांचे दर्शन

# 'श्रीराम लक्ष्मण जानकी,' 'जय हनुमान की'च्या जयघोषाने गौडगांव दुमदुमली




**सोलापूर/प्रतिनिधी**

शेवट श्रावणमास व शनि अमावस्येनिमित्त गौडगांब बु ।। येथील दक्षिणमुखी जागृत मारूतीच्या दर्शनासाठी राज्य व परराज्यातुन हजारो भाविकांनी शांततेत दर्शन आणि महाप्रसादाने तृप्त झाले. यावेळी भाविकांनी 'श्रीराम- लक्ष्मण -जानकी,' 'जय हनुमान की च्या जयघोषाने गौडगावची पहाट उजळून निघाली.

गौडगांवच्या या दक्षिण मुखी जागृत मारूतीच्या दर्शनासाठी भाविकांनी पहाटे पासुन मोठी गर्दी केली होती. शेवट श्रावण व शनि अमावस्येनिमित्त शुक्रवारी रात्री विविध धार्मिक कार्यक्रम पार पडला. श्रावणमास निमित्त महिनाभर चालणारा भजन कीर्तन, धार्मिक कार्यक्रम शनिवारी पहाटे समाप्त करण्यात आला. शनि अमावस्येनिमित्त शनिवारी पहाटे ४ वाजे पासुन मंदिरात मारूतीला रूद्राभिषेक, नवग्रह, होमहवन, महाभिषेक व महाआरतीचा विधी पार पडला. यावेळी हजारो भक्तानी या पुजेचा लाभ घेऊन समाधान झाले. दरम्यान श्रीच्या दर्शनासाठी भक्तांची लांबच्या लांब रांगा होती. भाविकांना दर्शन सुलभ होण्यासाठी मंदीर समितीच्या वतिने सोय करण्यात आली होती. यावेळी राज्य व परराज्यातुन आलेल्या जवळपास हजारो भाविकांनी शांततेत श्रीचे दर्शन घेतले. यावेळेस भक्तानी हनुमान चालीसा,मंत्रमंठण करून मंदीर परिसरात भक्तीचा माहोल निर्माण केला. मारुतीच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांना जागृत मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसादाची सोय केली होती. यावेळी हजारो भक्तांनी महाप्रसाद घेऊन तृप्त झाले, आणि मार्गस्थ होत असल्याचे पाहायला मिळत होते. प्रत्येक भक्तांची काळजी मंदिर समितीच्या विश्वस्थानी घेतली. यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, उपाध्यक्ष सिद्राम वाघमोडे, सचिव प्रकाश मेंथे आदीसह विश्वस्तानी परिश्रम घेतले.

# कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोल माफीची सवलत; पासेस, स्टिकर्स पोलीस, परिवहन विभागाकडे उपलब्ध!




**मुंबई/प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना पथकर (टोल) माफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला असून त्याची अंमलबजावणी शनिवार दि. २७ ऑगस्टपासून करण्यात येत आहे. मुंबई - बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग यावरील आणि इतर सार्वजनिक बांधकाम विभागांच्या रस्त्यांवरील पथकर नाक्यांवर ही सवलत दि. ११ सप्टेंबरपर्यंत असणार आहे. गेल्या महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफीसह अन्य सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते त्यानुसार आज सार्वजनिक बांधकाम विभागाने पथकर सवलतीचा शासन निर्णय जाहीर केला आहे. दिनांक २७ ऑगस्ट ते दिनांक ११ सप्टेंबर या कालावधीत मुंबई - बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग (राम-४८), मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग (रा. म. ६६) यावरील व इतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवरील पथकर नाक्यावर कोकणात जाणाऱ्या गणेशोत्सव भाविकांच्या वाहनांना पथकरातून सवलत देण्यात येत असल्याचे शासन निर्णयात म्हटले आहे. या टोलमाफी सवलतीसाठी गणेशोत्सव २०२२, कोकण दर्शन अशा आशयाचे स्टीकर्स स्वरुपाचे पथकर माफी पास, त्यावर वाहन क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर लिहून ते स्टीकर्स आवश्यक त्या संख्येनुसार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस/पोलीस, संबंधीत प्रादेशिक परिवहन विभाग (आर.टी.ओ.) यांनी समन्वय साधून पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौक्या व आर.टी.ओ. कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन द्यावेत. हाच पास परतीच्या प्रवासाकरीता देखील ग्राह्य धरण्यात येईल. पोलीस व परिवहन विभागाने गणेशोत्सवाच्या काळात पास सुविधा आणि त्यांच्या उपलब्धतेबाबतची माहिती नागरिकांना देण्याच्या देखील सूचना आहेत.

# जैन हिल्स येथे सर्जा-राजाचा पोळा सण उत्साहात साजरा

**जळगाव/प्रतिनीधी**

संबळचा तालबद्ध सूर ऋषभराजाला पांघरलेले झूल पायातील घुंगरू गळ्यातील घंट्याचा एक स्वर डौलात निघालेली मिरवणूक... पावरी नृत्य, आदिवासी नृत्य सोंग व घोडा, गुरख्या डेंगा हनुमान पार्वती मोर नंदीनृत्याविष्कार.. ढोल बाजाचा गजर ऋषभराजांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रत्येक सहकाऱ्याच्या चेहऱ्यावरील आनंद... ज्ञानपीठकार डॉ. भालचंद्र नेमाडे, जैन इरिगेशन अध्यक्ष श्री. अशोक जैन, गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुदर्शन अय्यंगार यांच्या फुगडीसह... विदेशी नागरीक डॅनियल हदाद (इस्त्राईल) यासह मान्यवरांनी, अनुभूती स्कूलचे विद्यार्थ्यांनी, गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक वाद्यांवर नृत्यांसह ठेका धरत आनंद द्विगणीत केला. जैन हिल्सवरील कृषी संशोधन विकास केंद्रावर बैल पोळा हा सण मोठ्या उत्साहात आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरा झाला. जैन कृषि संशोधन केंद्राच्या ध्यानमंदिरापासून मिरवणूकीस सुरवात झाली. श्रद्धाज्योत या श्रद्धेय भवरलालजी जैन यांच्या समाधीस्थळी बैलांच्या मिरवणूकीने प्रदक्षिणा घातली व वंदन केले. त्यानंतर श्रद्धाधाम, सरस्वती पॉईंट मार्ग सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती. मुख्य सोहळा जैन हिल्स हेली पॅड येथील मैदानावर झाला. यावेळी व्यासपीठावर



अणूशास्त्रज्ञ व गांधी रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, डॉ. भालचंद्र नेमाडे, महात्मा गांधीजींचे पणतू श्री. तुषार गांधी, जैन इरिगेशनचे अध्यक्ष श्री. अशोक जैन, श्री. राजा मयूर, डॉ. सुभाष चौधरी, डॉ. सुदर्शन अय्यंगार, डॉ. एम. पी. मथाई यांच्यासह जैन परिवारातील सर्व सदस्य व शहरातील मान्यवर उपस्थित होते. अशोक जैन यांनी पोळा फोडण्याच्या सोहळ्यासाठी हिरवी झेंडी दाखविली. सालदार अविनाश गोपाल यांनी पोळा फोडण्याचा मान मिळविला. सौ. ज्योती जैन यांच्यासह जैन परिवारातील सर्व सदस्यांनी बैलांचे विधीवत पूजन करून त्यांना गोड घास भरविला. जैन परिवारातील सर्वात लहान सदस्य अर्थम अथांग जैन याच्याहस्ते सुद्धा घास भरविण्यात आला. भव्य अशा व्यासपीठावर सप्तधान्याची रास, शेती उपयोगी अवजारांचे पूजन अशोक जैन यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते झाले.

**भूमिपुत्रांचा सत्कार**

जैन कृषि संशोधन विकास केंद्रातील विविध ठिकाणांवर २५ च्यावर बैल जोड्या आहेत. त्यांच्यासाठी ३५ च्यावर सालदार गडी शेती-मातीत राबत असतात. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत व जैन परिवाराच्या हस्ते सर्व सालदारांचा परिवारासह सत्कार व संसारोपयोगी साहित्य भेट सन्मानाने देऊन गौरव करण्यात आला. 'भारतीय संस्कृती, कृषी सांस्कृतिक वैभवाचा जैन हिल्स परिसरात मला अनुभव आला. प्रत्यक्ष सहभाग घेता आल्याने मी स्वत: ला भाग्यवान समजतो, अशी प्रतिक्रिया डॅनियल हदाद यांनी दिली.' 'ऋषभराजाला ऊर्जास्वरूपात आजही शेतीमध्ये स्थान आहे. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये, शेतीमध्ये ऋषभराजाला अनन्य साधारण महत्त्व त्याचमुळे प्राप्त झालेले आहे. पोळ्याच्या दिवशी ऋषभराजाचे पूजन त्याच्या कष्टाप्रती केलेला सन्मानच ठरतो अशी भावना डॉ. अनिल काकोडकर यांनी व्यक्त केली.' 'डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी भवरलालजी जैन यांची आठवण काढत पोळा सणात लोकसंस्कृती जोडली याचे नाविन्य जपत त्यांनाही महत्त्वाचे स्थान देण्याचे सुरू केले ही कृषी संस्कृती पुढच्या पिढीनेही जपली आहे याचा आनंद आहे. पोळा हा सण कान्हदेशात सांस्कृतिक मूल्य जोपासणारा ठरलेला आहे असेही ते म्हणाले.' 'सण-उत्सव वर्षभर येत असतात मात्र बळिराजा आणि त्याच्यासोबत राबणाऱ्या सर्जा-राजाचा कृतज्ञता व्यक्त करणारा सण पोळा बंधूभाव जोपासणारा वाटतो. गत २५ वर्षापासून हा सण जैन हिल्सला मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो यावर्षी सर्वांनी हिरीरीने सहभाग घेतला याचा आनंद असल्याचे जैन इरिगेशनचे अध्यक्ष श्री. अशोक जैन म्हणाले.' या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असलेले शेतकरी बांधव हे त्यांच्या परिवारासह उपस्थितीत होते. या पोळा सणाच्या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी जैन इरिगेशनच्या सर्व विभागातील सर्व सहकारी प्रयत्न केले. या कार्यक्रमात सहकारी हे परिवारासह उपस्थिती होते. यासह अनुभूती निवासी स्कूलमधील २०० हून अधिक विद्यार्थी, गांधी तीर्थ येथे देशभरातून अभ्यासक्रमासाठी आलेले विद्यार्थीही उपस्थितीत होते.

# गाव पाड्यातील रस्ते मुख्य रस्त्याशी जोडले जाणार -डॉ.विजयकुमार गावित




**पालघर/प्रतिनिधी**

पावसाळ्यामध्ये ग्रामिण भागातील रस्ते वापरण्या योग्य राहत नाहीत अशा गाव पाड्यात पक्के रस्ते तयार करुन हे रस्ते मुख्य रस्त्याशी जोडण्यात येणार असल्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितले. आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आदि विभागाची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयामधील जिल्हा नियोजन समिती सभागृहात घेण्यात आली.त्यानंतर पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित बोलत होते. यावेळी खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा, सुनिल भुसारा, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, आदिवासी विकास आयुक्त हिरालाल सोनावने, सहाय्यक जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, आयुषी सिंह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तुषार माळी, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. किरण महाजन, तसेच वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते. दुर्गम भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आरोग्य विभागातील रिक्त पदे लवकरच भरण्यात येतील दुर्गम भागातील ग्रामस्थामध्ये आरोग्य विषयक जनजागृती व्हावी यासाठी आशा सेविका घरोघरी जाऊन आरोग्याविषयी माहिती देणार आहेत. आदिवासी क्षेत्रातील समस्याचे समुळ उच्चाटन करण्यासाठी संबधित सर्व अधिकाऱ्यांना समन्वयाने काम करणाच्या सुचना दिल्या असल्याचे डॉ. गावित यांनी सांगितले. जल जीवन मिशन योजनेअंतर्गत हर घर जल या उपक्रमामध्ये गाव, पाड्यातील प्रत्येक घरात ५५ लिटर शुध्द पाणी मिळण्यासाठी पाणी शुध्दीकरण प्रकल्प स्थापन करण्यात येईल असेहि आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितले.

# बोरोळ येथे वाळूची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त; एकाविरुध्द गुन्हा दाखल

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील बोरोळ येथे मांजरा नदी पात्रातून अवैध रित्या वाळूची वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त करून गुरुवार दि.१८ ऑगस्ट रोजी रात्री देवणी पोलीस ठाण्यात एकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, दि.१७ ऑगस्ट रोजी रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास बोरोळ येथील मारुती मंदीर जवळ यातील आरोपींने विनापरवाना मांजरा नदीतून अवैधरित्या वाळू चोरून तिचा चोरटा विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने अवैध वाहतूक करीत असताना मिळून आला. या प्रकरणी पोलीस हेडकाँस्टेबल सुग्रीव गंगाराम कोंडमंगले यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १९७ /२०२२ कलम ३७९ भादवी व गौण खनिज अधिनियम १९५७ चे कलम २१(१) अन्वये अमर अजयकुमार पाटील राहणार बोरोळ यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हेडकाँस्टेबल कांबळे हे करीत आहेत. मात्र अजूनही लपून छपून अवैध वाळू उपसा सुरूच आहे.

# दुधनीतील अवैद्य धंद्याबाबत आम. कल्याणशेट्टी पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडली!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील शांभवी हॉटेलमध्ये सुरू असलेल्या आर्केस्ट्रा बार थिएटरसह ग्रामीण भागातील अवैध धंदे बंद करण्याबाबत अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडली. त्यावर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुधनीतील अवैद्य धंदे कायमस्वरूपी बंद करण्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना आदेश जारी करण्यात आल्याचे उत्तर दिले. आमदार सचिन कल्याणशेट्टी लक्षवेधी सूचना मांडताना म्हणाले, दुधनीत आर्केस्ट्रा बार थिएटर या नावाखाली डान्सबार पहाटेपर्यंत चालत असल्याची तक्रार त्या भागातील नागरिकांसह भक्तांनी वेळोवेळी प्रशासनाकडे केली आहे. तरीही त्याची दखल घेण्यात आली नाही. सदर आर्केस्ट्रा बार थिएटरचा परवाना जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी रद्द करून ही पुन्हा परवानगी दिल्याचे त्यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निदर्शनास आणून दिले. लाखो भक्त अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ आणि गाणगापूरला श्री दत्तात्रयांच्या दर्शनासाठी जातात याच मार्गावरील दुधनी शहरालगत शांभवी हॉटेलमध्ये अवैद्य धंदे चालतात असे आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, या प्रश्नाला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस यांनी सदरचा आर्केस्ट्रा बार व थिएटरची परवानगी कायमस्वरूपी रद्द करण्यात येत असल्याचे सांगून याकरिता वापरण्यात येणारी वीज देखील खंडित करण्याबाबत संबंधित विभागाला तांत्रिक बाबी तपासून घेण्याच्या सूचना देण्यात येईल, अवैद्य धंदे कायमस्वरूपी बंद न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## भिवंडीतील खड्डे दुरुस्तीसाठी राष्ट्रीय समाज पक्षा तर्फे पालिके समोर भीक मांगो आंदोलन



भिवंडी/अभिजित हिरे

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांची खड्ड्यांमुळे पूर्णतः दुरावस्था झाली असताना पालिका प्रशासन खड्डे भरण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने राष्ट्रीय समाज पक्षा तर्फे भिवंडी महानगरपालिका मुख्यालया समोर भीक मांगो आंदोलन करण्यात आले. राष्ट्रीय समाज पक्षाचे भिवंडी लोकसभा अध्यक्ष शिवम मिश्रा, भिवंडी प्रभारी भरतसिंह पाटिल, शहराध्यक्ष दिलीप लाला बागुल, महिलाध्यक्षा शहजहा अंसारी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात अनेक पक्ष कार्यकर्ते सहभागी झाले होते. ज्यांनी रस्त्यातील नागरिकांकडून झोळीत भीक एकत्रित करून महानगरपालिका मुख्यालयात निवेदन देऊन सुपूर्द करण्यात आली.भिवंडी शहरातील रस्त्यांची खड्ड्यांमुळे दुरावस्था झालेली आहे. गणेशोत्सव तोंडावर आलेला असताना पालिका प्रशासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. इतर गोष्टींवर कोट्यवधी रुपयांची उधळण करणारे पालिका प्रशासन रस्ते दुरुस्ती वर खर्च करीत नसल्याने आम्ही भीक मागून पालिकेस ते पैसे दुरुस्ती साठी देत असल्याची प्रतिक्रिया पक्षाचे भिवंडी लोकसभा अध्यक्ष शिवम मिश्रा यांनी दिली आहे.

## जिजाऊच्या विद्यार्थ्यांचे एमपीएससी मुख्य परीक्षेत घवघवीत यश

### राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२१ मध्ये ९ विद्यार्थी उत्तीर्ण!

वाडा/प्रतिनिधी



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत संपूर्ण कोकण विभागात जिजाऊ या सामाजिक, शैक्षणिक संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली आहे. या मुख्य परीक्षेत जिजाऊ अक्ॅडमीच्या ९ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे. जिजाऊ या संस्थेने संपूर्ण कोकण विभागात एमपीएससी व यूपीएससी या महत्त्वाच्या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी ४२ अभ्यास वर्ग व मोफत वाचनालय उपलब्ध करून दिली आहेत. या अक्ॅडमीमध्ये नियमित १२०० विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचाअभ्यास करीत आहेत. जिजाऊ अक्ॅडमीच्या माध्यमातून यश संपादन केलेले गेल्या १० वर्षात शासनाच्या महसूल, न्यायव्यवस्था, वनविभाग, आरोग्य, कृषी अशा विविध विभागात कार्यरत आहेत. जिजाऊ अक्ॅडमीमध्ये यशस्वी होऊन शासकीय सेवा मिळविणाऱ्यांची संख्या खुप जास्त आहे. गेल्या पाच वर्षात जिजाऊंच्या माध्यमातून ३०० हुन अधिक अधिकारी उच्च पदस्थ आहेत. यामध्ये काही पोलिस अधिकारी, एसआरएफ, बीएसएफ या सर्व सुरक्षा दलातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. निम सरकारी नोकरी, खाजगी क्षेत्रातीत नोकरी करीत असलेल्यांची संख्या एक हजाराहून अधिक आहे. जिजाऊ संस्थेच्या झडपोली, ता. विक्रमगड येथील अभ्यास वर्गात स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या स्वप्निल मोरे यांनी दोन महिन्यांपूर्वी युपीएससी परीक्षेत यश संपादन करुन जिजाऊ संस्थेचे नाव देशभर पसरविले आहे. स्वप्निल माने दलित समाजातील असुन त्याच्या आई-वडिलांचे निधन झालेले आहे. या अनाथ मुलाला जिजाऊ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे यांनी आधार दिला आहे. गत वर्षी स्वप्निल माने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशभरात उत्तीर्ण झाला आहे. तो सद्या आयएएस अधिकारी म्हणून कार्यरत आहे. आदिवासी, ग्रामीण भागातील विद्यार्थी अधिकारी घडावेत त्यांनी ग्रामीण भागाकडे अधिक लक्ष केंद्रित करावे या उद्देशाने जिजाऊ सामाजिक व शैक्षणिक संस्था संपूर्ण कोकण विभागात स्पर्धा परीक्षांचे अभ्यास वर्ग घेत आहे. आणि विद्यार्थ्यांचाही त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. नुकताच २६ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या एमपीएससी परीक्षेत ९ विद्यार्थी यशस्वी झाले हीच जिजाऊ अक्ॅडमीच्या मेहनतीची पोहोचपावती आहे, असे या संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांनी सांगितले.

## उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मिळणार पुरस्कार – सुधीर मुनगंटीवार

मुंबई/प्रतिनिधी

राज्य शासनाने दि. ३१ ऑगस्ट २०२२ पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवाकरीता राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना स्पर्धा घेऊन पुरस्कार देण्याचा निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने घेतला असल्याची माहिती, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकास रुपये पाच लाख, द्वितीय क्रमांकास रुपये दोन लाख ५० हजार आणि तृतीय क्रमांकास रुपये एक लाख इतक्या रकमेचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन मंडळांना गौरविण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील प्रथम क्रमांकांच्या गणेशोत्सव मंडळास २५ हजार रुपयांचे पारितोषिक आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक ३० ऑगस्ट २०२२ हा आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या गणेशोत्सव मंडळांनी धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे किंवा स्थानिक पोलिस स्थानक अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या www.pldeshpandekalaacademy.org या संकेतस्थळावर what is पशु या शीर्षकावर अर्ज उपलब्ध करून देण्यात आला आहे. विहित नमुन्यातील अर्ज mahotsav.pldagmail.com या ई मेल वर दिनांक ३० ऑगस्ट २०२२ पर्यत दाखल करता येतील. उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांची निवड विशिष्ट निकषांच्या आधारे गुणांकन देऊन जिल्हास्तरीय समिती तसेच राज्यस्तरीय समितीमार्फत करण्यात येईल, अशी माहिती पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने दिली.

## शिवणी येथे आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



औसा/प्रतिनिधी

औसा तालुक्यातील शिवणी बु. येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त ध्वजारोहण, प्रतिमेस पुष्पहारअर्पण,दीपप्रज्वलन महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती संतोष भाऊ सोमवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. तुकाराम भाऊराव साठे हे अण्णा भाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवासवर्णन अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतील लेखन केलेले ते एक ख्यातनाम मराठी साहित्यिक होते असेमत महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती संतोष भाऊ सोमवंशी यांनी मांडले अण्णाभाऊंनी विविध साहित्य प्रकार हाताळले, कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लावण्या, लोकनाटये, पदे, गीते अशी विविध क्षेत्रे त्यांनी सहजगत्या पादाक्रांत केली. आपल्या साहित्यातून शोषण, अन्याय, अत्याचाराला विरोध करणे हेच त्यांनी ध्येय मानले व मानवी वृत्ती, प्रवृत्तीचे वास्तव दर्शन वाचकांना घडविले, शब्दांना अंगाराचे रूप देऊन दलितांच्या निर्जीव मनाला चेतवत अण्णाभाऊ मराठी साहित्यातील अढळ पदावर विराजमान झाले असे मत महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती संतोष भाऊ सोमवंशी यांनी व्यक्त केले. यावेळी युवा सेना उपजिल्हा प्रमुख दिनेश जावळे, भागवत कांबळे, सरपंच किशोर जाधव, उपसरपंच शिवम बुके, लक्ष्मण जाधव, शरद गरड, तानाजी घोडके, ऋषी जाधव,धानोरा सरपंच सुरेश मुसळे जंयती समिती अध्यक्ष रवीराज सुर्यवंशी, आकाश सांळुके, बबलू कांबळे, प्रशांत कांबळे, खंडू कोम्पले आदी उपस्थित होते.

## सापने गावाच्या हद्दीत बस व ट्रकचा अपघात



वाडा/प्रतिनिधी

वाडा आगाराची बास्ते वाडा (एम.एच.२० बी.एल.३५३२) ही मानव विकास योजनेची बस सकाळी साडेसहा वाजता बास्ते येथून वाड्याच्या दिशेने निघाली होती. ही बस मनोर वाडा महामार्गावर आली असता बसला मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने अपघात झाला आहे. शुक्रवारी (दि२७ ऑगस्ट) सकाळच्या सुमारास सापने गावाच्या हद्दीत या बसला एका विद्यार्थीनीने हात केला असता तिला घेण्यासाठी बस थांबली मात्र याचवेळी पाठीमागून भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने (जि.जे.१५ एक्स. ८६१८) बसला धडक दिली. या अपघातात बस व ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झेल आहे.घटना स्थळी पोलीस व आगार व्यवस्थापक येऊन पाहणी करून गेले आहेत. बसमध्ये एकूण ५० प्रवाशी होते त्यापैकी एक विद्यार्थी किरकोळ जखमी झाला असून त्याच्यावर उपचार करून घरी पाठवण्यात आले असल्याची माहिती आगार व्यवस्थापक मधुकर धांगडा यांनी दिली.

## बिल्कीस बानो प्रकरणातील आरोपींच्या शिक्षामाफी विरोध राष्ट्रवादीचे आंदोलन




वाडा/प्रतिनिधी

गुजरात येथे उसळलेल्या २००२च्या दंगलीमध्ये बिल्कीस बानो या सहा महिन्यांच्या गर्भवती महिलेवर सामूहिक अत्याचार करण्यात आला होता. तसेच तिच्या तीन वर्षाच्या मुलीसह परिवारातील सर्व सदस्यांना ठार मारले होते. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने अकरा जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र स्वातंत्र दिनाचे औचित्य साधून या आरोपींना मुक्त करण्यात आले आहे. गुजरात सरकारच्या या शिक्षामाफीच्या विरोधात राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने वाडा तालुका अध्यक्षा मृणाली नडगे यांच्या नेतृत्वाखाली वाडा येथे आंदोलन करून मोदी सरकारचा निषेध करण्यात आला.

याप्रसंगी अश्विनी भोईर महिला शहराध्यक्षा, सुचीता पाटील माजी सभापती तथा नगरसेविका, रोहिणी शेलार गटनेत्या जिल्हा परिषद पालघर, भक्ति वलटे जिल्हा परिषद सदस्या, अक्षदा चौधरी जिल्हा परिषद सदस्या, पुनम पथवा पंचायत समिती सदस्या, सुचिता फराड पंचायत समिती सदस्या, संजना बेंडकोली नगरसेविका शहराध्यक्ष, विक्रमगड शहर, विराज पाटील- विक्रमगड विधानसभा युवक अध्यक्ष, विमलधर्म भास्कर- सामाजिक न्याय शहर अध्यक्ष, शानिदास फराड- माजी सरपंच खरिवली ग्रामपंचायत यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

पान १ वरून...

### देशभरातील विरोधीपक्षांसाठी ते ...

कचऱ्याच्या गाडीत टाकले जात आहेत. असेही केजरीवाल यांनी सांगितले आणि शेवटी मोदी आणि त्यांच्या पक्षाचे नाव न घेता त्यांना सिरीयल किलरची उपमा देऊन टाकली. त्यामुळे आता लोकांमध्येही भाजपा आणि मोदींच्या विरुद्ध जनजागृती होत आहे आणि त्याचे परिणाम २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला भोगावे लागतील असे आम आदमी पक्षाने म्हटले आहे.

### पत्नीबद्दल वाईट बोलणे सहन ...

वाद झाला. यानंतर वादाचे परिवर्तन हाणामारीत झाला. दारापुढे बैल पूजनाची तयारी सुरू असताना हा वाद सुरू होता. जवळच बैल पूजनासाठी लोखंडी पास ठेवण्यात आली होती. मोठा भाऊ पिंटू तीच पास घेऊन लहान भाऊ शिवाजी यांच्या डोक्यावर तीन वार केले. डोक्यावर जोरदार प्रहार झाल्यामुळे लहान भाऊ शिवाजी जागीच गतप्राण झाले. त्याला तात्काळ चाळीसगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु डॉक्टरांनी तपासून त्याला मयत घोषित केले.

### दोघांच्या होणार होत्या वेगवेगळ्या...

करीत होता. सुरूवातीला ती त्याचे मारहाण आणि गलिच्छ देणे हे सगळे सहन करीत होती. तिला संसारात आणि दोन्ही मुलात गोडी होती. त्यामुळे ती नवऱ्याच्या त्रासाकडे लक्ष देत नव्हती. तिने आपल्याला होत असलेल्या त्रास हा माहेरच्या लोकांना ही सांगितला होता. त्यांनी ही महबुबसाब याला समजावून सांगत आपली मुलगी तशी वागणार नाही, तुम्ही उगाच संशय घेऊन तिला मारहाण करून त्रास देवू नका असे सांगितले होते. पण ऐकेल तो कसला महबुबसाब होता. त्याच्या डोक्यात सुरूवाती पासूनच तिच्या चारित्र्याचा संशय घोळवत असल्याने तो सैरभैर झाला होता. आपली बायको कामाच्या नावाखाली दुसऱ्या तरूणाला भेटायला जाते, त्याच्या सोबत तिचे शारिरीक सबंध ही आहेत हेच त्याच्या डोक्यात बसले असल्याने त्याला या शिवाय दुसरे काहीच सुचत नव्हते. पै-पाहुण्यांनी यावर उपाय म्हणून त्या दोघांना ही साईनगर येथील घर सोडून दुसऱ्या ठिकाणी राहण्यास सांगितले. त्याचे ऐकून महबुबसाब हा पत्नी दोन मुलांना घेऊन मुनवळ्ळी येथे राहयला गेला. तेथे ही त्या दोघांची भांडणे होतच होती. शबानाचे माहेर बेळगाव जवळील खानापुर हे असल्याने ती सारखी भांडण झाले की माहेरी जावू लागली. हे ही महबुबसाब याला पटत नव्हते. मुनवळ्ळी येथे राहत असताना ही त्या दोघांचे पटत नव्हते.त्याच्या दररोजच्या भांडणाने घरमालकाने त्यांना खोली रिकामी करण्यास सांगितले होते. दररोजच्या भांडणाला ती वैतागलेली होती.काय करावे म्हणजे हा प्रश्न सुटेल असे तिला वाटत होते. त्यातच ती आपल्या एका मुलीला घेवून सौंदती येथे नवऱ्याला सोडून राहु लागली, म्हणून त्याचा संशय आणखीनज जास्त बळावला. तो ती राहत असलेल्या ठिकाणी जावून ही तिला शिव्या देत मारहाण करीत होता. त्याच्या या मारहाणीचा त्रास तिलाजास्तच होऊ लागल्यावर तिने एक टोकाचा निर्णय घेतला. नवऱ्यापासून घटस्फोट मिळावा म्हणून न्यायालयात अर्ज केला. एक तर ती दुसऱ्याबरोबर लफडे करते, चांगली वागत नाही आणि उलट आपल्या विरोधात आपल्याला सोडून आपल्यापासून घटस्फोट मिळावा म्हणून कोर्टात जाते याचा राग महबुबसाब याला आला. तो तिच्यावर पिसाळलाच होता. तिचे दुसऱ्याबरोबर लफडे आहे आणि ती त्याचेबरोबर लग्न करून दुसरा संसार करणार असल्याची माहिती त्याला मिळाली होती.आता त्याच्या मनात वेगवेगळे विचार येत होते. शबानाला चांगलाच धडा शिकवायचा असा त्याने विचार केला. तिने कोर्टात अर्ज करून चार सहा महिने झाले होते.तारखेला ते दोघे ही येत होते. कोर्टातून घटस्फोट घेण्याआधी घटस्फोटासाठी अर्ज करण्याचे समुपदेशन केले जाते. तसे समुपदेशन दोन तारखांना त्या दोघांचे ही केले गेले होते. ती त्याला काडीमोड दयायला तयार होती. पण तो तिला काडीमोड दयायला तयार नव्हता.त्याचे मुलावर जास्त प्रेम होते. त्याला आपला संसार टिकवायचा होता. पण सांगून ही ती ऐकत नसल्याने आणि बाहेरचे संबंध तोडत नसल्याने तो तिला मारहाण करीत होता. कोर्टात देखील त्याने हेच सांगितले होते. समुपदेशन करणाऱ्यांनी त्या दोघांची समजूत घालून संसार कसा टिकवायचा एकदा का संसार मोडला की मुलांचे भविष्य अंधातरी होते हे ही सांगितले होते. कोर्टाचे म्हणणे त्याला पटत होते. पण तिला काही त्याचेबरोबर संसार करायचा नसल्याने ती त्याला सोडायला तयार होती. आता कसा ही करून आपला संसार मोडणारच आहे याची त्याला खात्री झाली होती. ती बाहेरच्या लफडयात अडकली आहे आणि त्याच्या बरोबरच दुसरे लग्न करणार आहे हे त्याला समजल्याने तो तिच्यावर चिडून होता. यातून मार्ग काढण्याचा ही त्याने प्रयत्न केला पण त्यात त्याला यश आले नाही. शेवटी हिलाच कायमचे संपविले तर आपल्या पाठीमागची डोके दुखी जाईल शिवाय हिने आपल्याला सोडून दुसऱ्याबरोबर लग्न केले तर समाजात पै-पाहुण्यात आपली अब्रु जाणार हे त्याने ओळखले होते.एक बायको नीट सांभाळयला आली नाही हे बोल त्याला लागणार होते.म्हणून त्याने शेवटचा एक निर्णय घेतला. गुरूवार दि.१८ ऑगस्ट रोजी कोर्टाची तारीख आहे हे त्याला माहित होते.त्या तारखेला ती येणार हे ही त्याला माहित होते. कोर्टात नेहमी प्रमाणे त्या दोघांचे समुपेशन करण्यात आले.तेथे दोघांनी माना हालवत समुपदेशन करणाऱ्याचे ऐकून घेतले.त्याच्यासमोर दोघांनी ही संसार करण्याचे मान्य केले. पण दोघांच्या मनात शंका असल्याने दोघे ही शंकेखोर मनाने कोर्टातून बाहेर पडले.समुदेशन दरम्यान तिने नवरा महबुबसाब याच्या विरूध्द दोन चार गोष्टीची तक्रार केली होती. त्यामुळे समुदेशन करणाऱ्यांनी त्या दोघांचे म्हणणे ऐकून घेऊन दोघांना ही समजावून सांगण्यापेक्षा नवरा महबुबसाब यालाच ताकीत दिली होती. तेथे ही तिने त्याची मानहाणी केली होती. सगळे जण आपली काही चुक नसताना आपल्यालाच दोषी ठरवित आहेत. बायको शबाना ही दुसऱ्याबरोबर राहते ती ज्याच्या बरोबर राहते त्याच्याशी दुसरे लग्न करणार आहे हे लक्षात आणून देवून ही आपल्यालाच सरळ वागण्याचा सल्ला दिला जातो हे म्हणजे अतीच झाले.तो विषय त्याच्या डोक्यात बसला होता. कोर्टातून ती आधी बाहेर पडली. बाहेर कोर्टाच्या आवरात गर्दी होती. त्या गर्दीतून ती लगबगीने चालली होती. ती घाईगडबडीत घरी चालली असताना तिने बाहेर येत रिक्षा केली आणि आपले घर गाढले. ती घरात जात असताना पाठीमागून आलेल्या महबुबसाब याने तिला हाक मारली. ती मागे वळून बघत असताना त्याने आपल्या खिशातील धारदार चाकू बाहेर काढला आणि तिच्या मानेवर पोटावर सपासप असे पाच सहा वार केले. ती ओरडतच घराशेजारील रस्त्यावरच रक्ताच्या थारोळ्यात पडली. त्याने सपासप वार केल्याने तिच्या मानेतून आणि पोटातून मोठया प्रामाणात रक्तस्त्राव झाला. तिचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी लोकांची गर्दी जमली होती. त्याच्या हातात धारदार रक्ताने माखलेला चाकू होता. या गोंधळात तिच्या घराशेजारील लोक ही घटनास्थळी आले. काहीनी धाडसाने पुढे होते महबुबसाब याच्या हातातून रक्ताने माखलेला चाकू काढून घेतला. या घटनेची माहिती मिळताच सौंदती पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सौंदती येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला आणि संशयीत महबुबसाब गोरवनकोळ्ळ याला ताब्यात घेतले. या घटनेची माहिती मयत शबानाच्या नातेवाईकाकडून पोलीसांना मिळाली असल्याने ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याचा अंदाज पोलीसांना आला होता. शिवाय संशयीत आरोपी हा पोलीसांच्या ताब्यात असल्याने त्याचेकडून ही पोलीसांना घटनेविषयी माहिती मिळाली होती. त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. मयत शबाना हिच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी शबाना महबुबसाब गोरवनकोळ्ळ (वय २८) हिच्या खून प्रकरणी तिचा पती महबुबसाब गरीबसाब गोरवनकोळ्ळ (वय ३०) याचेविरोधात आयपीसी कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने त्याची रवानगी बेळगाव येथील हिडलंगा जेलमध्ये केली. न्यायलयीन कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास सौंदती पोलीस करीत आहेत. चारित्र्याच्या संशयाने पुरूषाचे मन एकदा का खराब झाले की तो विषय त्याच्या डोक्यातून कधी ही जात नसतो त्यातूनच पत्नी जर त्याला सोडून बाहेर एकटीच राहत असेल तर मग तर त्याची खात्रीच होते आणि मग तो तिच्यावर डुख धरून राहतो. आपल्याला दगा देवून दुसऱ्याबरोबर संसार करायला निघालेल्या पत्नीला धडा शिकविण्यासाठी तो टोकाचे पाऊल उचलतो. अगदी असेच शबाना आणि महबुबसाब याचे झाले होते. तिने कोर्टात काडीमोडीसाठी अर्ज केला. चिडून जावून मग त्याने तिचा खूनच केला.हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून...

### मोतीचंद दुरुगकरांना जिवनगौरव...

असे त्यांचे व्यक्तीमत्त्व आहे. कुटुंब वत्सल त्यांना पाच मुले व दोन मुली, सुना नातवंडे, पणतू, पणती असा त्यांचा खूप मोठा परिवार आहे. कुटुंबात आणि समाजात त्यांनी शिक्षणाची ओढ निर्माण केली. आज त्यांचे ४ नातू वैद्यकीय क्षेत्रात तर ६ नातू इंजिनअरिंग क्षेत्रात कार्यरत आहेत.

### दिनेश सोनी यांना सोशल...

अभ्यासपूर्ण लिखाण Indian.Temples या इन्स्टाग्राम पेज आणि युट्यूब चॅनलच्या माध्यमातून प्रकाशित करीत आहेत. विविध विषयांवर आतापर्यंत त्यांची १६ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. यापुर्वी त्यांना या विषयातील संशोधनासाठी ताईवान मधील ताईपेई विद्यापिठाने सन्मानित केलेले आहे. सोबतच त्यांना रोटरी इंटरनॅशनलचा पॉल हॅरीस फ़ेलो आणि ऑस्ट्रेलियामधिल रोटरी क्लबद्वारे रोटरी हिरो अवार्ड हे पुरस्कारदेखील त्यांना प्राप्त आहेत.

### कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला ...

राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस अध्यक्षा ड.रंजना धुळे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले,या स्पर्धेमध्ये तालुक्यातील आठ संघाने भाग घेतला होता सदर स्पर्धेत भिसेगाव येथील जय अंबे माता महिला ग्रुपने प्रथम क्रमांकाची बाजी मारली. नेरळ येथील राजेंद्रगुरु नगर ग्रुप या महिला गटाने द्वितीय क्रमांकाची पटकावला तर उकरूळ येथील सरस्वती महिला ग्रुप या गटाने तृतीय क्रमांक मिळवला. राणी लक्ष्मीबाई महिला गट नालधेवाडी तसेच हिरकणी महिला ग्रुप वदप या दोन महिला गटांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.विद्या विकास शाळा नेरळ येथील माजी मुख्याध्यापिका आसावरी काळे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले सोनम भोपतराव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. याप्रसंगी आरवंद येथील रोहिणी नामदेव मोडक या विद्यार्थ्यांनीने वेटलिफटिंग चॅम्पियनशिप २०२२ या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला म्हणून कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या वतीने माजी नगराध्यक्षा रजनी गायकवाड यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला.

# देवणी पोलीस ठाणे येथे शांतता कमीटी बैठक संपन्न




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी पोलीस ठाणे येथे उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता कमीटीची बैठक घेण्यात आली. यावेळी तालुक्यातील गणेश मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरक उपस्थित होते. सदर बैठकीत कोल्हे म्हणाले कि वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांचे पालन करावे. डि.जे. लावु नये मा.कोर्टाने दिलेल्या नियम अटींचे पालन करावे असे सुचना यावेळी देण्यात आल्या. बैठकीस पोलिस निरीक्षक गणेश सोंडारे, सहायक पोलिस निरीक्षक पंकज सिंगारे, पोलीस उपनिरीक्षक मुजहेद शेख, पोना विनायक कांबळे, अक्रम शेख, ज्येष्ठ नेते, हावगिराव पाटील, काशिनाथ गरिबे, अनिल इंगोले, मनोहर पटणे, अशोक लुल्ले, रमेश मनसुरे, किशोर निडवंचे जाफर मोमीन, नदीम मिर्झा, अमित मानकरी, रशीद मल्लेवाले, रमेश कोतवाल, रेवण मलभगे, शकिल मनियार, जाकिर बागवान, गिरिधर गायकवाड, प्रताप कोयले रणदिवे लक्ष्मण, नरसिंग सुर्यवंशी, बालाजी कवठाळे, माधवराव मुर्गे, आनंद जिवणे, शिवाभाऊ कांबळे, मनोज लांडगे यांच्या सह पोलिस पाटील, तंटामुक्ती अधयक्ष, गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार चंद्रकांत मोठेरावे यांनी केले. तसेच बैठकिनंतर गणेश उत्सव निमित्त विसर्जन मिरवणूक मार्गे पोलीस अधिकारी, पोलीस आंमलदार, होमगार्ड, पोलीस पाटील, विद्यार्थी यांच्यासोबत रूट मार्च कडण्यात आला. सदर रुट मार्च मध्ये ३ पोलीस अधिकारी, १५ पोलीस कर्मचारी, ३७ होमगार्ड, १०० विद्यार्थी उपस्थित होते.

# आहेरवाडी खून प्रकरणी चौघांना जन्मठेप



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथील शेतीचा वाद परस्पर मिटविण्याचा कारणावरून मल्लिकार्जुन धोंडप्पा दिंडोरे (४२) यांच्यावर गोळीबार करून खून केल्याप्रकरणी तीन सख्ख्या भावासह चौघांना जन्मठेप व प्रत्येकी दोन लाखांचा दंड जिल्हा न्यायाधीश आर. एन. पांढरे यांनी ठोठावला आहे. शरणप्पा उर्फ बप्पू शिवानंद दिंडोरे (२८), बसवराज महादेव दिंडोरे (४९), सिद्धाराम महादेव दिंडोरे (४८) व शिवानंद महादेव दिंडोरे (५४) अशी शिक्षा ठोकवण्यात आलेल्या चौघांची नावे आहेत. याबाबत मधुकर धोंडप्पा दिंडोरे यांनी वळसंग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. १९ मार्च २०१७ रोजी दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास आहेरवाडी शिवारातील दिंडोरे वस्ती येथे फिर्यादी त्यांचा भाऊ मल्लिकार्जुन, आई व बहीण भागीरथी हे वस्तीवर असताना आरोपी शरणाप्पा उर्फ बप्पू, बसवराज, सिद्धाराम व शिवानंद हे सर्वजण हत्यारासह तेथे आले. बहीण भागीरथी हिच्याची असलेला जमिनीचा वाद आरोपीच्या संमतीशिवाय परस्पर का मिटवला असे म्हणून चिडून आरोपी शरणप्पा उर्फ बप्पू याने तुम्हाला ठार मारतो म्हणून मधुकर व मल्लिकार्जुन यांच्या दिशेने बंदुकीतून गोळ्या झाडल्या. त्या गोळ्या मल्लिकार्जुन यांच्या डोक्यात, गळ्यावर, पोटात लागल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरिता अश्विनी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार चालू असताना २१ मार्च २०१७ रोजी मल्लिकार्जुन यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी चौघांच्या विरोधात वळसंग पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी घटने दिवशी दोघांना अटक केली होती. त्यानंतर सहा महिन्यांनी अन्य दोघा आरोपींना अटक करण्यात आली होती. सहाय्यक पोलीस निरीक्षक इंद्रजीत वर्धन यांनी तपास करून गुन्हा दाखल करून न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार शितल साळवे यांनी काम पाहिले. या खटल्यात सरकार तर्फे एकूण १४ साक्षीदार तपासण्यात आले. त्यातील सहा साक्षीदार फुटले. त्यामुळे सरकार पक्षाने त्यांची न्यायालयात साक्ष नोंदवली नाही. इतर दोन साक्षीदार, मृतांचा शवविच्छेदन अहवाल, डॉक्टरांची साक्ष, न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल, बॅलेस्टिक एक्सपर्टची साक्ष व त्यांचे अहवाल घटनास्थळावरील सापडलेले बहुतेक पुरावे, पंचनामे यावरून सर्व आरोपींनी मल्लिकार्जुन यांचा सामायिक उद्देश डोळ्यासमोर ठेवून खून केल्याचा व्यक्तिवाद सरकार पक्षाने न्यायालयात केला. तर आरोपींच्या वकिलांनी अनोळखी व्यक्तीने गोळीबार केला व बॅलेस्टिक अहवाल संशयास्पद असल्याचा बचाव केला परंतु



सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एन. पांढरे यांनी सर्व चारही आरोपींना खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा व प्रत्येकी दोन लाख रुपये दंड ठोठावला. तसेच मृतांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाख रुपये आरोपीने द्यावेत रक्कम न दिल्यास एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावले यात सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग रजपूत तर आरोपीतर्फे वकील प्रशांत देशमुख, वकील व्ही. डी. फताटे, वकील पी. बी. लोंढे पाटील व वकील रामभाऊ रिसबूड यांनी काम पाहिले.

दरम्यान आजपर्यंत ८५ जणांना जन्मठेप तर दोघांना फाशीची शिक्षा. जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांनी अनेक अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांनी केलेल्या कौशल्यपूर्ण व अभ्यासपूर्ण युक्तीवादामुळे न्यायालयाने त्यांच्या कार्यकाळात आत्तापर्यंत ८५ जणांना जन्मठेप व दोघांना फाशीची शिक्षा सुनावली आहे.

राजस्थान जालोर दलित विद्यार्थ्यांच्या हत्येस जबाबदार असणाऱ्यांना फाशी द्या!

# आरपीआय सेक्युलरचा भिवंडी तहसील कार्यालयावर मोर्चा!



**भिवंडी/प्रतिनिधी**

राजस्थानच्या जालोर जिल्ह्यातील सुराणा गावातील सरस्वती विद्या मंदिर शाळेच्या इंद्र देवाराम मेघवाल या आठ वर्षाच्या निरागस दलित विद्यार्थ्याने तहान लागली म्हणून मुख्यध्यापक छैलसिंहच्या मटक्यातून पाणी पिण्याचा प्रयत्न केला म्हणून छैलसिंहने आठ वर्षाच्या मुलाला बेदम मारहाण केली. या मारहाणीत दलित विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना घडली असून या घटनेचा निषेध करीत, सदरचा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपींना फाशी ची शिक्षा द्यावी, मयत विद्यार्थ्याच्या कुटुंबाला न्याय मिळण्यासाठी आरपीआय सेक्युलरचे प्रदेश सरचिटणीस ॲड.किरण चन्ने यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी शेलार मिठपाडा ते भिवंडी तहसीलदार कार्यालयावर निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.तहसीलदार कार्यालयासमोर पोलीसांनी मोर्चास अडवल्या नंतर मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले. यावेळी मयत विद्यार्थी इंद्र मेघवाल हत्येचा निषेध नोंदविण्यात आला. त्यांनतर सेक्युलरचे प्रदेश सरचिटणीस ॲड किरण चन्ने यांच्यासह शिष्टमंडळाने भिवंडी तहसीलदार अधिक पाटील यांच्याकडे राष्ट्रपतीं च्या नावे असलेले आपल्या मागण्यांचे निवेदन सोपविले. हे निवेदन शालेय विद्यार्थीनी तहसीदारांकडे सोपविले व या घटनेची दखल केंद्र शासनासह राजस्थान सरकार व देशाच्या राष्ट्रपतींनी घ्यावी व मयत विद्यार्थ्याच्या कुटुंबाला न्याय द्यावे अशी मागणी केली.

# राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या मागास शिष्यवृत्ती परीक्षेत श्री महादेव विद्यालयाचे घवघवीत यश



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील धनेगाव येथील श्री महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या मागास शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहेत. जुन २०२२ मध्ये इयत्ता आठवीसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे तर्फे घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेत देवणी तालुक्यातील धनेगाव येथील श्री महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेसाठी एकूण २६ विद्यार्थी बसले होते. या गुणवंत विद्यार्थ्यामध्ये बोयणे गायत्री उमाकांत, काचे स्वप्ना वीरभद्र, जढाळे सायली संतोष, कांबळे नागेश प्रताप हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.या विध्यार्थ्याचा सत्कार उपसरपंच रविंद्रकुमार पाटील, रामलींग शेरे, ग्रामसेवक श्रीकांत पताळे, यांच्या हस्ते करण्यात आला. या विद्यालयाचे सन २००७ ते आज पर्यत ५५ पेक्षा जास्त विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाली आहेत. त्यांना नववी ते बारावीपर्यत दर महा १००० रुपये शासनाचे अनुदान मिळत आहे. हे विद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. कारण श्री महादेव विद्यालयाने एनएमएमएस परीक्षेत यशाची परंपरा पंधरा वर्षापासून सतत कायम ठेवलेली आहे. म्हणून देवणी तालुक्यातील ग्रामीण भागातील श्री महादेव विद्यालय एक नामांकित विद्यालय म्हणून ओळखले जाते. आज पर्यत या विद्यालयाने शिष्यवृत्ती, नवोदय, चित्रकला, आर्थिक दृष्ट्या मागास शिष्यवृत्ती परीक्षा, दहावी, बारावी, पदवी परीक्षेत बरेच विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहेत. या विद्यालयाने गुणवत्तेबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक, कला, क्रीडा, विज्ञान, या विविध क्षेत्रात विकास करण्यासाठी विद्यालय सतत प्रयत्नशील असते. या विद्यार्थ्यांना मडपडवाड जी.एन., शहापूरे डी.आर., मोमले एम.पी.यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष डी.बी. लोहारे गुरुजी, सचिव डॉ. सुनिताताई चवळे, प्राचार्य रामलिंग मुळे, पर्यवेक्षक बंडगर चंद्रकांत सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

# चोरट्याला जेरबंद करुन सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर एमआयडीसी पोलिसांची कामगिरी**



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरातील एमआयडीसी पोलिसांनी एका अल्पवयीन चोरट्यास अटक केली असून तीन घरफोड्या उघडकीस आणल्या आहेत. यामध्ये १ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे फरार असलेल्या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दिवसा व रात्रीच्या घरफोड्या वाढल्या होत्या. त्या अनुषंगाने तपास करीत असताना एका अल्पवयीन मुलाने घरफोड्या केल्याचे उघडकीस आले. त्याच्याकडून १ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे २०१० पासून एका गुन्ह्यांमध्ये फरार असलेला अशपाक महिबूब शेख तसेच २०१४ पासून फरार असलेला राम ऊर्फ पाप्या राजू निंबाळकर या दोघांना अटक करण्यात आली आहे. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजन माने, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित चौधरी, पोलीस अंमलदार राकेश पाटील, अय्याज बागलकोटे, सचिन भांगे, अमोल यादव, शैलेश स्वामी आदींनी केली आहे.

# देशप्रेमाच्या जोरावर देशाचे भविष्य उज्ज्वल करण्याचे धाडस हे सैनिकच करु शकतात-कॉ.धनंजय कुलकर्णी

**लातूर/प्रतिनिधी**

भारताच्या ७५व्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभर सगळीकडेच मोठ्या उत्साहाचे वातावरण आहे. देशातील प्रत्येक नागरीक स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवात सहभागी होत आहे. याच पार्श्र्वभूमीवर ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशन या बँक कर्मचारी संघटनेच्या वतीने माझी सैनिकांप्रती कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. देशप्रेमाच्या जोरावर देशाचे भविष्य उज्ज्वल करण्याचे धाडस करतो, प्रसंगी जीवाची बाजी लावतो, तोच सैनिक देशाचे खरे आधारस्तंभ आहेत असे प्रतिपादन बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी केले.सध्या देश स्वातंत्र्याचा ७५ वा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. या दिवसाला अविस्मरणीय करण्याच्या उद्देशाने -खइजचएऋ या बँक कर्मचारी संघटनेच्या वतीने आझादी का अमृत महोत्सव सोहळ्यांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा पत्रक देणे, प्रभात फेरी रॅली तसेच माझी सैनिकांप्रति कृतज्ञता अशा कार्यकांचे आयोजन करण्यात आले. याच पार्श्र्वभूमीवर लातूर येथील बँक कर्मचाऱ्यांच्या वतीने समतेचा संदेश देणारी प्रभात फेरी रॅली काढण्यात आली. तसेच अखंड देश, अखंड राष्ट्र, अखंड भारत हि भावना मनात बाळगून देशाला प्रेरणा देण्याचे काम माझी सैनिक करीत असतात म्हणूनच त्यांच्याप्रती कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन बँक ऑफ महाराष्ट्र, लातूर मुख्य शाखा येथे करण्यात आले. याप्रसंगी बोलताना बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. धनंजय कुलकर्णी म्हणाले कि, विपरीत परिस्थितीत राहून सैनिक हा देशाचे रक्षण करतो, म्हणूनच हेच खरे देशाचे आधारस्तंभ आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात देशावर अनेक युद्धे लादली गेली. काही युद्धे सीमेवर लढली गेली तर काही देशांतर्गत. आशा प्रत्येक प्रसंगी देशाच्या सीमांचे, देशवासीयांचे रक्षण करण्याच्या कामी स्वतःचा जीव धोक्यात घालून सैनिकांनी दिलेले योगदान अवर्णनीय आहे. देशासाठी सर्वस्व अर्पण करण्यास सैन्यात दाखल होणाऱ्या व आपला कार्यकाळ पूर्ण करून येणाऱ्या अशा सर्वच माझी सैनिकांप्रति त्यांनी ऋण व्यक्त केले. बँक कर्मचारी हा अर्थ-वीर असून त्यांनी शूरवीर माझी सैनिकांकडून प्रेरणा घ्यावी असेही ते म्हणाले. कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख अतिथी जेष्ठ पत्रकार श्री. रामराव गवळी यांनी बँक कर्मचारी संघटनेच्या वतीने आयोजित केलेल्या कृतज्ञता सोहळ्याची स्थूथी केली व येणाऱ्या काळात अशे कार्यक्रम करावेत म्हणून शुभेच्छा दिल्या.सदरील कार्यक्रमाला लातूर जिल्ह्यातील माझी सैनिक विनोद साळवे, राजेंद्र कदम, श्री गुट्टे, महादू एकलारे, खंडू बागले, गुलाब पिरजादे, श्री. मुंढे, बाळासाहेब जाधव, प्रदीप तोरे, मारुती यादव, उद्धव मोहिते, किशन बुट्टे, संतोष कटाळे, शंकर पवळे, श्री. मिरकले, गोपीनाथ गोरे, श्री. हादूळे, सुग्रीव वाघमारे, सुग्रीव जाधव, कुशल गिरी, गोविंद गुंडरे, रघुनाथ सूर्यवंशी, बाळासाहेब जाधव, फुलचंद ढोरे, श्री. सोमवंशी आदी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते माझी सैनिकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञतापर सत्कार करण्यात आला. माझी सैनिकांनी मनोगत व्यक्त करत त्यांच्या कार्यकाळातील अविस्मरणीय क्षणांचे वर्णन केले.

# आर्थिक पाठबळ नसताना शून्यातून विश्व निर्माण करणारे वसंत देडे

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

कोणतीही आर्थिक पाठबळ नसताना एखाद्या व्यवसायाची पायाभरणी करणे, हे तसे अवघड काम. मात्र, वसंत देडे यांनी हाताशी कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना शून्यातून स्वतःचे विश्व निर्माण करत, पेटींग व्यवसाय उभारले. त्यांच्या व्यवसाय भरारीमुळे आज घडीला मातंग समाजाचे शेकडो युवकांना पेंटींग रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.तालुक्यात एक कर्तृत्ववान समाजसेवक म्हणून वसंत देडे सुपरिचित झालेत. त्यांच्या आयुष्याची कहाणी सांगणारा हा लेख!



ठाम राहायला शिकावं, निर्णय चुकलं तरी हरकत नाही.स्वतःवर विश्वास असला की,जिवनाची सुरुवात कुठूनही करता येते, फक्त हिम्मत पाहिजे, वसंत देडे यांनी मात्र करून दाखविले.पूर्णपणे खचलेले असताना पुन्हा नव्याने शून्यातून विश्व निर्मितीकडे संघर्षमय जीवन सुरू केले, चांगल्या-वाईट व्यक्तीबरोबर मैत्री केली. क्रांतिगुरू लहुजी वस्ताद यांचा आशीर्वाद आणि पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष महादेव महाराज भोसले यांची साथ मिळाली आणि जीवन जगणे सुलभ झाले. स्वतः अडचणीवर मात केलाच, पण दुसऱ्यांच्या अडचणीत जाण्याचाही निर्धार केला. 'कर्तृत्ववान उद्योजक' म्हणून ओळख असलेले वसंत देडे हे मूळचे कोळीबेटचे रहिवासी. १९६९ रोजी त्यांचा जन्म झाला. कोळीबेट जिल्हा परिषदेच्या शाळेतच त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले.वालचंद कॉलेज येथे शिक्षण बीए पर्यत शिक्षण घेतलेले वसंत देडे यानी स्वतःचा व्यवसाय सुरू केले. अनंत अडचणी आल्या पण निराश न होता. परिस्थितीतही खचून न जाता स्वतःच्या स्वबळावरच पैसे कमावून व्यवसाय उभारला. समाजसेवक म्हणुन सर्वाच्या मदतीला धाऊन जाण्याचा निर्धार केला. अक्कलकोट हे स्वामी समर्थाची पावनभुमी म्हणुन जगप्रसिद्ध आहे. येथे येणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. शहर हे बाजारपेठ असल्याने या बाजारपेठेत खरेदी विक्रीसाठी ग्रामीण भागातील नागरिकांची सतत वर्दळ असते.अशा वेळी शहरात पिण्यासाठी पाणपोईची सोय नसल्याने स्वतःची तहान भागविण्यासाठी मिनरल वॉटर बाटली विकत घेऊन तहान भागवावी लागते. तहान भागविण्यासाठी गरीबांचा पैसा खर्च होऊ नये म्हणुन वसंत देडे यांनी मोफत थंड पाण्याचे जार ठेवून पाणपोई सुरू केली. हे उपक्रम गेल्या दहा वर्षापासुन सुरू आहे.केवळ सेवा आणि छंद म्हणून वसंत देडे यांनी पाणपोईच्या माध्यमातुन गोरगरीबांना अखंडपणे सेवा देत आहे. कोरोना महामारीच्या वाईट परस्थितीत अत्यावश्यक सेवा देणारी पोलीस यंत्रणा रस्त्यावर बंदोबस्तासाठी ठाण मांडून उभी होती. कडक उन्हात बंदोबस्त करणाऱ्या पोलीस बांधवांना पिण्याच्या पाण्याची सोय व पोलिस इतर शासकीय कर्मचाऱ्यांना लिंबु सरबत देऊन माणसातील माणुसकी जपण्याचे आदर्श कार्य करत आहे.

# चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागिनेसह रोख रक्कम ८ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/करकरे अंबादास**



पोलीस ठाणे चाकूर हद्दीतील मौजे नळेगाव येथील घरात अज्ञात प्रवेश करून घरात कोणीही नसल्याचा फायदा घेऊन कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ०९ लाख ५७ हजार रुपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून घेऊन गेले आहे. अशा तक्रारीवरून पोलीस स्टेशन येथे गुरनं ३०२/२०२२ कलम ४५४, ३८० प्रमाणे दिनांक २३/०८/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा उघडकीस आणण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी निर्देशित केले होते. त्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर व अहमदपूर चे उपविभागीय पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी गेला माल व अज्ञात आरोपीतांचा शोध घेणे कामी पोलीस पथक नेमुन तपासा बाबत सूचना देऊन तपासाची चक्र फिरवली. गोपनीय माहितीच्या आधारावरून मोठ्या शिताफीने आरोपी उमर मुनवर मुजावर, वय २० वर्ष, राहणार नळेगाव. यास ताब्यात घेऊन त्यांचेकडे गुन्ह्याबाबत विचारपूस केले असता आरोपीने गुन्हा केल्याची कबुल केले व गुन्हात चोरलेले सोन्या चांदीचे दागिने रोख रक्कम असे एकूण ०८ लाख रुपयाचा मुद्देमाल काढून दिला आहे. गुन्ह्यातील उर्वरित मुद्देमाल हस्तगत करण्याची प्रक्रिया सुरू असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे चाकूरचे पोलीस उपनिरीक्षक आर.व्ही.घाडगे करीत आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी निकेतन कदम, पोलीस स्टेशन चाकूर चे पोलीस निरीक्षक बालाजी मोहिते व त्यांच्या टीमने घरफोडीच्या गुन्ह्याचा अतिशय जलद गतीने व कौशल्य पूर्वक तपास करून अवघ्या १२ तासात गुन्ह्याची उकल करून गुन्हा उघडकीस आणून गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदर कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी,चाकूर निकेतन कदम, चाकूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी मोहिते, पोलीस उपनिरीक्षक,घाडगे कपिल पाटील, फड, पोलीस अमलदार योगेश मरपले, कोळेकर, स्वामी, हनुमंत मस्के यांनी केली आहे.

29 AUGUST TO 04 SEPTEMBER 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 8/27/2022 9:17 PM Page 1



# दलितवस्त्यांच्या कामात तफावत

## चौकशी आहवाल सादर करणार -मनीषा फुले

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाची चौकशी करित असताना दलितवस्त्या यांच्या कामात तफावत प्राथमिकदृष्ट्या दिसून आल्याची माहीती समाजकल्याण आयुक्तालयातील विशेष अधिकारी मनीषा फुले यांनी क्राईम संध्या च्या प्रतिनिधीशी बोलताना दिली. समाजकल्याण विभागातील विविध योजनांची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून पथक दाखल झाले आहे. कार्यालयीन फाईल्यांची कसून तपासणी करण्यात आली आहे. आत्ता पर्यत बारा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. काही किरकोळ तक्रारांचा निपटारा करण्यात आला आहे. मोहोळ, अक्कलकोट आदी ठिकाणाच्या दलितवस्ती सुधार योजना कामकाजाची तपासणी करण्यात आली आहे. कामात तफावत असणाऱ्यांचा अहवाल समाजकल्याण आयुक्त यांच्याकडे सादर करणार असल्याचे



मनीषा फुले यांनी सांगितले. जिल्हा परिषदेतील समाजकल्याण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या दलितवस्ती विकास योजनेची कामे वाटताना टक्केवारी घेतल्याचा आरोप डीपीसीत आमदार राम सातपुते यांनी केला होता. डीपीसी ठरावाची प्रतची मागणी करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या तत्कालीन सदस्यांनी ही याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दिली होती. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य वाढले होते. दरम्यान भारतीय जनता पार्टीच्या अनुसुचित जाती मोर्चाचे सचिव संजीव खिलारे यांनी समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेत समाजकल्याण विभागाच्या आयुक्तांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेण्यात आली आहे. खिलारे यांच्या तक्रारीवरून झेडपीच्या समाजकल्याण विभागाची २२ऑगस्टपासून चौकशी सुरू झाली आहे. २६ ऑगस्टपर्यंत या कार्यालयातील कागदपत्रांची सखोल चौकशी होणार आहे. विविध योजनेचा लाभ देताना घोळ करण्यात आल्याचे पुरावे खिलारे यांनी सादर केले आहेत.

**त्या सदस्यांना करणार विचारणा**

समाजकल्याण समिति समोर १० जानेवारी २०२२ रोजी १६ कोटी ५० लाखांचा निधी परस्पर वाटप केल्याची तक्रार जिल्हा परिषद सदस्यानी केली होती. या तक्रारी संदर्भात विचारणा करण्यासाठी त्यांना पत्र देण्यात देणार असल्याचे मनीषा फुले यांनी सांगितले.

# हुतात्मा स्तंभावरील एक स्तंभ गायब; दुरुस्तीची मागणी

**अहमदपूर/फिरोज शेख**

अहमदपूर शहरात भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात आत्मार्पण केलेल्या हुतात्म्याच्या व कारावास भोगलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ नगर परिषदेच्या जुन्या इमारतीसमोर गेल्या अनेक वर्षापासुन दोन हुतात्मा स्मारक अस्तित्वात होते. याची दुरावस्था झाल्याने नवीन बांधकामात हुतात्मा स्तंभावरील स्वातंत्र्यसैनिकांची नावे जाणीवपूर्वक मागच्या बाजूला लावून व तसेच एकच स्तंभ केल्याबद्दल हुतात्मा स्मारक गौरव समीतीच्या वतीने उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक नगर परिषद अहमदपूर यांना हुतात्मा स्मारक समीतीच्या वतीने निवेदन दिले आहे. सदरील हुतात्मा स्मारकाची दुरुस्ती नगर परिषदेमार्फत गेल्या काही महिन्यापूर्वी झाल्याचे समजते. या हुतात्मा स्मारकावर पूर्वी दोन स्तंभ होते. त्या दोन्ही स्तंभावर स्वातंत्र्यसैनिकांची नावे ठळक पद्धतीने पुढच्या बाजूला कोरलेली होती. मात्र नवीन बांधकांमामध्ये यामधील एक हुतात्मा स्तंभच गायब करण्यात आलेला आहे.




स्वातंत्र्यसैनिकांचे फक्त आठ नावे पुढच्या स्तंभावर कोरलेली असुन इतर उर्वरीत ४५ नावे हि मागील बाजूला कोरून हुतात्मा स्तंभावर बाकीचे नावे दर्शनी स्वरूपात दिसत नसल्यामुळे या स्वातंत्र्यसैनिकांचा या कृतीमुळे अवमान होत आहे.नगर परिषदेच्या वतीने पूर्वीप्रमाणे दोन स्तंभ तातडीने बांधुन या दोन्ही स्तंभावर समोरील बाजूस ठळक पध्दतीने या स्वातंत्र्यसैनिकांचे नावे लिहावेत व होणारा अपमान तातडीने थांबवावा अन्यथा सदरील प्रकरणाच्या विरोधात तीवृ स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल यास नगर परिषद कार्यालय व वैयक्तिक जबाबदार असाल याची गांभीर्याने नोंद घ्यावी असे दिलेल्या निवेदनात म्हटले असुन या निवेदणावर हुतात्मा स्मारक गौरव समीतीचे पदाधिकारी प्रा. दत्ताभाऊ गलाले, मराठा सेवा संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. गोविंद शेळके, युवक नेते डॉ. सिध्दार्थकुमार सुर्यवंशी, पांडुरंग गलाले, अॅड. आनंद जाधव, शिवाजी गलाले, बालाजी गलाले, दिपक पाटील, राजकुमार पाटील, दिगांबर गलाले, सचिन बनाटे यांच्यासह हुतात्मा स्मारक गौरव समीतीच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कै.राघवेंद्र काथवटे यांची जन्मशताब्दी विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी!



**लातूर/प्रतिनिधी**

कै.राघवेंद्र काथवटे यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,कीर्तन तसेच विविध धार्मिक उपक्रम घेण्यात आले. राघवेंद्रदादा काथवटे प्रतिष्ठानच्या वतीने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त राघवेंद्र निवासस्थानी धार्मिक विधी संपन्न झाले.दुपारच्या वेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त वृद्धाश्रमातील वृद्ध आणि अनाथालयातील विद्यार्थ्यांसाठी भोजन सेवा देण्यात आली. काथवटे परिवाराच्यावतीने दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या १०० गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. बारावी परीक्षेतील १०० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला. गातेगाव येथील भागवताचार्य विद्यानंदसागर महाराज यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला. बुधवारी रात्री बुलढाणा येथील पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे कीर्तन संपन्न झाले. या कीर्तनास परसरातील हजारो नागरिकांची उपस्थिती होती. यावेळी काथवटे परिवारातील न्या.रिना खराटे व ऋचा चिकोडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याशिवाय सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे विक्रमी रक्तदाते पारस चापसी, प्रभुराज प्रतिष्ठानचे अजय कलशेट्टी, राजेश्वर बुके यांनाही सन्मानित करण्यात आले. कै.राघवेंद्र काथवटे यांचे पुत्र जयंत काथवटे, नागेंद्र काथवटे, चंद्रवदन काथवटे, नातू अॅड. दिग्विजय काथवटे, गौरव काथवटे, रमण काथवटे, रितेश काथवटे यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# मोतीचंद दुरुगकर यांना जिवनगौरव पुरस्कार



**औसा/प्रतिनिधी**

औसा येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक मोतीचंद व्यंकोबा दुरुगकर यांना सोलापूर येथील जैन कासार प्रतिष्ठान तर्फे सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला. सोलापूर येथील डॉ निर्मलकुमार फडकुले सभागृहात जगत्विख्यात प्लस्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांच्या हस्ते व जेष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत, अशी माहिती प्रतिष्ठान चे अध्यक्ष कांतीलाल नळे यांनी पत्रपरिषदेत दिली. यावेळी डॉ विठ्ठल लहाने यांचे यशाचा पासवर्ड या विषयी व्याख्यान होणार आहे. मोतीचंद दुरुगकर हे कासार गुरुजी या नावाने ओळखले जातात. शिक्षक ते केंद्रीय मुख्याध्यापक असा संपूर्ण प्रवास ३६ वर्षे त्यांनी सायकलवर केला. ५ मार्च १९५४ रोजी औसा तालुक्यातील भेटा या गावी शिक्षक म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर चाटा, कन्हेरी, आपचुंदा, वांनवडा, लखनगाव आदी ठिकाणी सायकलवरच जाऊन ज्ञानदानाचे कार्य केले. गोठ्यातून त्यानी मुलांना शिकवले. शेवटचे १५ वर्ष केंद्रीय मुख्याध्यापक म्हणून त्यांनी काम केलं. १९८८ ला सेवानिवृत्त झाले तेव्हा लातूर तालुक्यातील चाटा या गावी बैलगाडी मधून वाजत गाजत मिरवणूक काढली, व यथोचित सन्मान करून निरोप दिला. नोकरीच्या काळात त्यांनी सामाजिक व धार्मिक क्षेत्रात देखील काम केले.औसा येथील सार्वजनिक गणेश मंडळ ते नवरात्र उत्सव मध्ये त्यांचा मोठा सहभाग होता. चिंतामणी गणेश मंदिर उभारणी मध्ये योगदान दिले. तसेच जैन मंदिराचे विश्वस्त म्हणूनही त्यांनी काम केले आहे. सर्व समाजवेषक मित्रप्रिय ...पान ६ वर

# केशवराज विद्यालयात मातृदिन व बैलपोळा साजरा




**लातूर/प्रतिनिधी**

येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात मातृदिन व बैलपोळा असा संयुक्त कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी भारत माता व योगी अरविंद घोष यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. मंचावर शाळेचे मुख्याध्यापक सुनील वसमतकर, पर्यवेक्षक संदीप देशमुख, बबन गायकवाड तसेच अभ्यास पूरक मंडळ प्रमुख शैलजा देशमुख, सहशिक्षिका रेणुका गिरी यांची उपस्थिती होती. यावेळी यशश्री मुंडे या विद्यार्थिनीने मातृदिन व बैलपोळा या विषयी माहिती सांगितली.

भारतीय संस्कृतीमध्ये आईला दैवत मानतात. संस्कारातून यशाच्या शिखरावर चढवते ती आई असते असे ती म्हणाली. बैलपोळा हा सण ग्रामीण भागांमध्ये अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो, अशी माहिती तिने विद्यार्थ्यांना दिली. संगीत विभागाच्या वतीने संतोष बीडकर व त्यांच्या संघाने आई आणि बैलपोळा यावरची 'हंबरून वासराला चाटती जवा गाय', 'जिवा शिवाची बैल जोडी' ही गीते सादर केली. श्री केशवराज विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील वसमतकर यांनी आई व मूल यांचे नाते वात्सल्याचे व नैसर्गिक आहे असे मत व्यक्त केले.आपण आपल्या आईचा आदर करावा. माया, प्रेम, काळजी यातूनच हे नाते फुलते. आपलं मुल कितीही मोठं झालं तरी त्याची काळजी आई घेतच असते, असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, मान्यवरांचा परिचय व स्वागत कार्यक्रम प्रमुख सौ.इंदू ठाकूर यांनी केले.सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आदिती जाधव, आदिती पाटील या विद्यार्थिनींनी केले. जान्हवी गरुड या विद्यार्थिनीच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आमदार धीरज भैया देशमुख यांच्या शुभ हस्ते महाराजा गणपतीचे पुस्तक प्रकाशन



**लातुर/प्रतिनिधी**

भव्यतेची परंपरा जपणारा संस्कृतीची जोपासना करणारा आणि एकात्मतेची जपवणूक करणारा लातूर शहरातील गणेश मंडळ म्हणजे लातूरचा महाराजा गणेश मंडळ होय यावर्षी लातूरचा महाराजा गणेश उत्सव अतिशय उत्स्फूर्त आणि जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने लातूरचा महाराजा गणपतीचे पुस्तक प्रकाशन सोहळा लातूर ग्रामीणचे आमदार माननीय श्री धीरज भैया विलासराव देशमुख साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आला या सोहळ्यास लातूरचा महाराजा गणपतीचे अध्यक्ष गणेश भैय्या एस.आर. देशमुख तसेच मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साईराज पवार संस्थापक सचिव राजेश लखादिवे संस्थापक उपाध्यक्ष रवी ओझा कोषाध्यक्ष अभिजीत पाटील, अतुल जी कदम पंडित कावळे ऋषिकेश शेंडे पाटील विजयकुमार धुमाळ कैलास पाटील अजय कुमार बोराडे पाटील अनुप मलवाड महादेव जी मुळे राहुल वाकडे गणेश मुगळे नीरज पाटील समीर मणियार रोहित गंजेवार राहुल झिरमिळे आदी उपस्थित होते.

# मोदी सरकार विरोधात काँग्रेस पक्षाची महागाईवर चर्चा




**वाडा/प्रतिनिधी**

केंद्रातील भाजपा सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांचा फटका जनतेला बसत आहे. मोदी सरकारच्या काळात महागाई व बेरोजगारीने उच्चांक गाठला आहे मागील १४ महिन्यात महागाईचा दर दोन अंकी झाला आहे. पेट्रोल, डिझेल, एलपीजी, सीएनजी, खाद्यतेल, डाळी व किराणा माल याचे भाव सामान्यांच्या आवाक्य बाहेर गेले आहेत. महागाईने सर्वसामान्य माणसाचे कंबरडे मोडले असताना मोदी सरकारने दूध, दही, पनीर, पीठ, मीठ, व तांदूळ यासारख्या दररोज लागणाऱ्या वस्तूंवर जीएसटी लावून महागाईत आणखी भर घातली आहे. मुलांच्या शालेय वस्तू हॉस्पिटलमध्ये बेडवर जीएसटी लावलाच पण स्मशानभूमी बनवतानाही जीएसटी द्यावा लागणार आहे. मोदी सरकार महागाईवर नियंत्रण मिळवण्यात फेल झाले आहे तर दुसरीकडे जीएसटीचा भडीमार करून सरकार आपली तिजोरी भरत आहे. म्हणून मोदी सरकारचा निषेध करण्यासाठी वाडा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने वाडा शहरातील महागाईवर चर्चा हा कार्यक्रम राबविण्यात आला. शहरातील छोटे-मोठे व्यापारी, भाजीपाला-फळ विक्रेते यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन केंद्र सरकारविरोधात रोष, असंतोष व संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. जिल्हा अध्यक्ष प्रफुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या महागाईवर चर्चा या कार्यक्रम प्रसंगी काँग्रेस कमिटीचे वाडा तालुका अध्यक्ष दिलीप पाटील, नगरसेविका भरती सपाटे, सुशिल पातकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिनेश सोनी यांना सोशल मिडीया क्षेत्रातील डिजीटल इन्फ्ल्युएन्सर अवार्ड




**लातूर/प्रतिनिधी**

सोशल मिडीयाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्यासाठी दै.लोकमतद्वारे देण्यात येणारा डिजीटल इन्फ़्ल्युएन्सर अवार्ड २०२२ या वर्षासाठी लातूरच्या दिनेश सोनी यांना प्रदान करण्यात आला. इंडीयन टेम्पल्स या इन्स्टाग्राम पेज आणि यूट्यूब चॅनलद्वारे पुरातत्व शास्त्र, पुराणशास्त्र, मुर्तीशास्त्र आणि प्रतिमाशास्त्र या विषयावर केल्या जाणाऱ्या जनजागरण कार्यासाठी त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हेरीटेज या श्रेणीमध्ये दिनेश सोनी यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. पुण्यातील जे डब्ल्यू मॅरियट हॉटेल या ठिकाणी आयोजित सत्कार सोहळ्यामध्ये सुर्यदत्ता ग्रुपचे चेअरमन डॉ.संजय चोरडीया यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी चित्रपट कलाकार सोनाली कुलकर्णी, भाडीपा या चॅनलचे फाऊंडर सारंग साठ्ये आणि पॉला मॅक्लिन, गोयल गंगा ग्रुपचे अतुल गोयल, प्रख्यात युट्युबर आणि इन्व्हेस्टमेंट ड्व्हाईजर रचना रानडे, प्रख्यात डान्स युट्युबर झैद व अनम दरबार, युट्युबर कृष्णकांत आदींची प्रमुख उपस्थिती होती. दिनेश सोनी हे मागील ३ वर्षांपासून प्राचीन मंदिरांविषयी ...पान ६ वर

# हिप्परसोगा तंटामुक्त समिती अध्यक्षपदी सोमवंशी




**औसा/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील हिप्परसोगा येथील तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदी बालासाहेब सोमवंशी (दाजी) तर उपाध्यक्षपदी राम संपते यांची निवड करण्यात आली. तंटामुक्त गाव समितीचे पदाधिकारी निवडण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील यांच्या अध्यक्षतेत बैठक घेण्यात आली.या बैठकीत समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. या बैठकीस लातूर जिल्हा बँकेच्या संचालिका तथा हिप्परसोगा सोसायटीच्या चेअरमन स्वयंप्रभा पाटील, ग्रामसेवक धनश्री माळी, अतुल पाटील, हेमंत पाटील, पोलीस पाटील बालाजी कांबळे, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष विठ्ठल सोमवंशी, नागोराव आळंदकर, मनोज सोमवंशी, छत्रभुज सोमवंशी, समाधान कांबळे, छगन कांबळे, ज्ञानेचश्वर आळंदकर, सुशील सोमवंशी, आत्मा संपते, उद्धव यादव, भगवंत यादव यांच्यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसतर्फे मंगळागौर स्पर्धा संपन्न

**कर्जत/धर्मानंद गायकवाड**

कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या वतीने मंगळागौर २०२२ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, या स्पर्धेला महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला या मध्ये आठ संघाने भाग घेतला होता. रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या आशीर्वादाने, कर्जत खालापूर मतदार संघाचे माजी आमदार सुरेश लाड यांच्या मार्गदर्शनाखाली, माजी पालकमंत्री आमदार आदिती तटकरे यांच्या संकल्पनेतून,रायगड जिल्हा राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या अध्यक्षा उमा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या वतीने मंगळागौर २०२२ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कर्जत नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्ष रजनी गायकवाड होत्या, यावेळी व्यासपीठावर राजिप माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, माजी उपाध्यक्ष अशोक भोपतराव, कर्जत तालुका राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष सागर शेळके, उपाध्यक्ष उत्तम पलांडे, रा.जि. प.सदस्या रेखा दिसले, अस्सल चे



सरपंच रमेश लदगे, दामतचे सरपंच जबिर नजे, शहराध्यक्ष पुष्पा दगडे, नगरसेविका भारती पालकर, सुवर्णा निलधे, मधुरा चंदन, माजी नगरसेविका अर्चना बैलमारे, उकरूळच्या सरपंच वंदना थोरवे, बीडच्या सरपंच प्रभावती लोभी, बोरिवली सरपंच वृषाली क्षीरसागर, नांदगावच्या सरपंच पल्लवी कारोटे, वदपच्या सरपंच नीरा विचारे, दामतच्या उपसरपंच नयना आखाडे, उकरुळच्या उपसरपंच निलिमा थोरवे, वदपच्या माजी उपसरपंच मनिषा पाटील, जिते सदस्या वंदना हजारे, बोरिवलीच्या सदस्या नेहा खडे, वदपच्या सदस्या कल्याणी पोटे, वंदना शिंदे, संगीता बडेकर, भारती घारे, निता पाटील, सुरेखा क्षिरसागर, मधुकर घारे, बंडू तुरडे, केशव मुने, संतोष थोरवे, राजन क्षीरसागर, भगवान पाटील, स्वरूप पाटील आदी उपस्थित होते. कर्जत तालुका ...पान ६ वर